नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ऑगस्ट
१९६२

या अंकात

★

मूल्य ५० नं. पैसे

संपादक:- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र—

युगवाणी

संपादक:—श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] ऑगस्ट १९६२ [अंक ४

अनुक्रमणिका

संपादकीय–

लोकमान्यांचे पुण्यस्मरण–

भारताच्या अलीकडील राष्ट्रीय जीवनात ऑगस्ट महिन्याला एक विशेष स्थान प्राप्त झालेले आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठी जे अनेक प्रयत्न झाले त्यांचे वेगवेगळे पर्व मानले व त्या त्या पर्वाच्या प्रवर्तकावरून त्याला नाव दिले तर अशा पर्वात 'टिळक पर्व' हे अत्यंत महत्वाचे पर्व ठरते. लोकांमध्ये जागृति करून पारतंत्र्याविषयी असंतोष त्यांच्या ठिकाणी उत्पन्न करण्याचे महत्वाचे कार्य लोकमान्यांनी केले. 'भारतीय असंतोषाचे जनक' ही त्यांच्या शत्रूंनी दूषण म्हणून दिलेली पदवी इतिहासाने भूषण ठरविली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीचेच एका अर्थाने ते जनक होते. त्यांच्या मृत्यूच्या तिथीने ऑगस्ट महिन्याचा प्रारंभ होतो. या स्वातंत्र्य लढयातील शेवटची लढाई १९४२ साली जी सुरू झाली ती ऑगस्ट महिन्याच्याच ९ तारखेला आणि या सर्व चळवळीचे फळ जे स्वातंत्र्य ते भारतीयांच्या हाती पडले तेहि ऑगस्टच्या १५ तारखेलाच. तेव्हा भारतातील कोणत्याहि नियतकालिकाच्या ऑगस्टच्या अंकात या गोष्टींचे स्मरण केलेले असणे स्वाभाविक आहे.

लोकमान्यांनी जी अनेक चिरंतन स्वरुपाची कार्ये केली त्यात आजच्या युगाला अत्यंत आवश्यक असे कर्मयोगाचे तत्वज्ञान दिले हे अेक होय. लोकांची कर्मप्रवृत्ति जागृत करणे व त्यावरोबर स्वार्थनिवृत्ति करणे या गोष्टी स्वातंत्र्यसंपादनाच्या काळात जशा आवश्यक होत्या तशा त्या स्वातंत्र्योत्तर काळातहि आवश्यक आहेत. किंबहुना निष्काम कर्माचरण–मग ही निष्कामता मर्यादित स्वरूपाची का असेना–सर्व काळी उपयुक्त असेच आहे. ७०० वर्षापूर्वी श्री ज्ञानेश्वरांनी लोकांना अशा स्वधर्माचरणाचा उपदेश केला होता. आणि ज्ञानेश्वरादि संतांच्या शिकवणीचा पुढील स्वातंत्र्य संपादनाला फार उपयोग झाला ही गोष्ट सर्वमान्यच आहे. लोकमान्यांनी आपल्या काळची परिस्थिति लक्षात घेऊन तेच कर्मयोगाचे तत्वज्ञान पुनः लोकांच्या समोर मांडले. या तत्वज्ञानाचा स्वातंत्र्य संपादनाच्या कामी निश्चितच उपयोग झाला. परंतु आज पुन्हा स्वार्थपरायणता वाढीला लागलेली व कर्तव्याचरणाचा लोप होत चाललेला दिसत आहे. अशा परिस्थितीत लोकमान्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने त्यांच्या कर्मयोगाच्या तत्वज्ञानाचा विचार, उच्चार, आचार व प्रचार होणे जरूर आहे.

अनुक्रमणिका

१८९६ साली शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने लोकमान्य टिळकांनी थोर पुरुषांच्या उत्सवासंबंधी जे विचार व्यक्त केले ते स्वत: लोकमान्यांच्या पुण्यतिथि उत्सवालाहि तितकेच, लागू पडणारे आहेत. लोकमान्यांनी लिहिले होते, 'शिवजयंती सारखे थोर पुरुषांचे उत्सव करून त्यांच्या कृतीचे व उद्योगाचे आपल्या देशबांधवात स्मरण जागृत ठेवणे हे आमच्या प्रयत्नाधीन असून कृतज्ञता बुद्धीने म्हणा अगर देशहिताच्या दृष्टीने म्हणा हे आपले पहिले कर्तव्य आहे.' लोकमान्यांचे पुण्यस्मरण करणे हे असेच आपले कर्तव्य आहे. आम्ही लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीला अभिवादन करतो व श्रद्धांजलि अर्पण करतो.

श्री. देशपांडे यांचे अभिनंदन

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे हे पॅरिस येथे युनेस्को तर्फे भरलेल्या साक्षरता प्रसार तज्ञ समितीच्या बैठकीला भारताचे प्रतिनिधि म्हणून गेले असता, त्या समितीच्या सदस्यांनी त्यांची अध्यक्ष म्हणून एकमुखाने निवड केली. ही गोष्ट भारताला भूषणावह आहे. या निवडीबद्दल आम्ही त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. या निवडीने पर्यायाने वि. सा. संघ गौरवान्वित झाला आहे.

'मराठी'च्या दोन ज्येष्ठ प्राध्यापकांचा सत्कार

नागपूर विद्यापीठात मराठी भाषा व साहित्य हा अभ्यासविषय सुरू झाल्यापासून त्या विषयाचे अध्यापन करणारे दोन ज्येष्ठ प्राध्यापक, डॉ. शं. दा. पेंडसे व प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या विद्यार्थ्यांनी व हितचिंतकांनी त्यांचा सत्कार करण्याचे योजिले आहे ही समाधानाची गोष्ट आहे. प्राचार्य पांढरीपांडे यांच्या सत्कारासाठी न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली एक सत्कार समिति सहा महिन्यापूर्वीच स्थापन झाली असून डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या सत्कारार्थ डॉ अ. ना. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नुकतीच अस्तित्वात आली आहे. दोन्हीहि समित्यांनी आखलेल्या कार्यक्रमात सारखेपणा असून एकेक 'गौरव ग्रंथ' प्रकाशित करण्याची योजना त्यांत प्रमुख आहे.

प्राचार्य पांढरीपांडे यांचे कार्य अध्यापन क्षेत्रापुरतेच मर्यादित न राहता 'शिक्षणक्षेत्र व्यापी' झाले. या प्रांतात त्यांनी शिक्षण क्षेत्रात जे रचनात्मक कार्य केले आहे ते प्रचंड असून स्फूर्तिप्रद आहे. त्यांच्या वृत्तीतील सौजन्य, वाणी व लेखणीतील संयम व समतोलपणा, त्यांची क्रियाशीलता व कार्यकुशलता तसेच निरलसता व निर्लोभवृत्ति इ. अनेक गुण अनुस्मरणीय व अनुसरणीय आहेत.

अनुक्रमणिका

डॉ. शं दा. पेंडसे यांची कीर्ति, कुशल अध्यापक, प्रभावी वक्ता, संत-वाङ्मयाचा गाढ व्यासंगी व प्रकांड पंडित म्हणून महाराष्ट्रभर पसरलेली आहे. मराठीचे अध्यापन कोणत्या भूमिकेवरून व कोणत्या दृष्टीने व्हायला पाहिजे हे डॉ. पेंडशांनी स्वत:च्या अध्यापनाच्या आदर्शाने व वाणी व लेखणी यांच्या सहाय्याने उत्तमरीतीने दाखवून दिले आहे. संतवाङ्मयाकडे पाहण्याचा अेक निकोप दृष्टिकोन, तर्क-शुद्ध बैठक व स्फूर्तिप्रद संदेश या गोष्टी त्यांनी आपल्या प्रभावी वाणीच्या द्वारे विद्यार्थ्यांना दिल्या.

या दोघाहि ज्येष्ठांचा त्यांच्या कार्यासाठी यथोचित गौरव होणे आवश्यक आहे. या कार्यासाठी स्थापन झालेल्या दोन्ही सत्कार समित्यांना त्यांच्या कार्यात आम्ही सुयश चिंतितो.

—श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

नव्या जगात

(लेखांक ३ रा)

लेखक : **प्रा. गो. मा. कुलकर्णी,**
सेंटलुई, अमेरिका.

[गेल्या दोन अंकात बंद असलेली ही लेखमाला या अंकापासून पुन्हा चालू करीत आहोत. हे लेख वाचण्याला उत्सुक असलेल्या अनेक वाचकांना त्यामुळे समाधान वाटेल. **—संपादक**]

अमेरिकन कुटुंबात 'स्वातंत्र्यदिन'

१५ ऑगस्ट हा भारताचा स्वातंत्र्यदिन. त्या दिवशी आम्हा सर्वांस व आमच्या होस्टेस्ना मि. व मिसेस् इशान यांनी संध्याकाळी आपल्याकडे जेवायला बोलावलं होतं. वेळ सातचा होता पण आम्ही साडेसात वाजता पोचलो. इथे अगदी औपचारिक समारंभ वगळल्यास वेळेचं काटेकोर बंधन पाळीत नाहीत. उशीरा गेलं तर excuse me for showing up late असं म्हणायचं आणि पेयाचा एक ग्लास घेऊन इतरात मिसळून जायचं. बराच वेळ पेय घेणं, बिस्किटं खाणं व गप्पा मारणं चालू असतं. त्या दिवशी आम्ही थोडे उशीराच गेलो कारण 'बेबी सिटर' लवकर आली नाही. आम्ही जाताच मिसेस् इशाननं एक सरबताचा ग्लास माझ्या हातात दिला व जे बोलायला लागली ते पंधरा मिनिटं. या अमेरिकन् स्त्रिया एकदा बोलायला लागल्या की थांबत नाहीत. त्यांना थांबवायचं तंत्र अमेरिकन पुरुषांनाच अवगत आहे. आमच्या दृष्टीनं एक महत्वाची गोष्ट मिसेस् अर्लनं मला तेवढ्यात सांगितली. " How glad you will be to know Mr. kulkarni that Dr. kawle has come to join us ?" असं म्हणून मला तिनं डॉ. कावळ्यांकडे पलीकडच्या दालनात नेले. ११ ऑगस्ट रोजी डॉ. कावळ्यांना इरपिनियावर हेल्थ ऑफिसराच्या ताब्यात सोडून आम्ही आलो होतो, त्याची रूखरूख आम्हा सर्वांना होती. पण मिसेस् अर्ल रोज हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांकडे फोन करून डॉ. कावळ्या विषयी चौकशी करीत असे आणि 'He is doing fine' असा निरोप आम्हा प्रत्येकाच्या होस्टच्या घरी फोन करून कळवीत असे. डॉ. कावळ्यांचं सर्व व्यवस्थित व्हावं व १५ ऑगस्ट पर्यंत

अनुक्रमणिका

ते आमच्यात यावेत अशी खटपट मिसेस् अर्लनं केली व तिला यश येऊन डॉ. कावळे १५ ऑगस्टला संध्याकाळी डेरियनला आले व जेवणाला उपस्थित राहिले. याचा आम्हा सर्वांनाच फार आनंद झाला.

बराच वेळ गप्पा झाल्या नंतर 'Would you help yorseltf' अशी सूचना आली. मग आम्ही आमच्या प्लेटमध्ये आम्हांला काय पाहिजे ते घेतलं व वगीच्यात टेवल मांडले होते तिथे जाऊन वसलो. तिथेंहि प्रत्येकाच्या नांवाची चिठ्ठी होती. दोघे आम्ही व दोघे अमेरिकन अशी वाटणी केली होती. जेवता-नाच्या गप्पामध्ये 'भारतात सगळे शाकाहारी आहेत का ?' असा प्रश्न हमखास विचारला जातो. नाही म्हणून सांगितल्यावर त्यांना वरं वाटतं.

बांका प्रसंग

जेवणानंततर प्रेसिडेंट केनेडीच्या निवडणूक प्रचाराची आणि त्याच्या अधिकारग्रहण समारंभाची फिल्म दाखविण्यात आली. मि. इशाननं लहानसं भाषण करून आमचं स्वागत केलं आणि प्रत्येकाला चित्राचं एक अल्वम भेट म्हणून दिलं. भारताच्या स्वातंत्र्याचा उल्लेख करून दोन्ही देशाच्या मैत्रीचा पुरस्कार केला. आमच्या तर्फे कृष्णस्वामीनं आभार मानले. लहानसं पण अति-शय भावपूर्ण भाषण त्यानं केलं. सर्व कुटुंबांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद दिले. विशेषतः 'आमच्यावर आईवडिलां सारखं आणि वहिणभावा सारखं प्रेम तुम्ही केलं.' असं तो म्हणाला ते सर्वांना फार आवडलं. नंतर मी त्याला म्हणालो, "मी बोललो असतो तर हेच वोललो असतो." अतिशय भावपूर्ण व सौहार्दमय वातावरणात कार्यक्रम संपला. आणि लगेच एक वांका प्रसंग निर्माण झाला. कुणीतरी म्हटलं "आज भारताचा स्वातंत्र्यदिन आहे तेव्हां भारताचं राष्ट्रगीत झालं पाहिजे." आली की पंचाईत. येत नाही म्हणणं किती नामुष्कीचं. येकटया मला 'जनगणमन' पाठ येत होतं. वाकीच्यांना एखाद दुसरी ओळ यायची. मी तरी वारा वर्षांत श्लोक देखील मोठ्यानं म्हटला नव्हता. पण विचार करायला वेळ नव्हता. माघार घेण्याचा तर प्रसंगच नव्हता. अमेरिकनांना भारतीय संगीताचं ज्ञान नाही याचा केवढा आनंद झाला त्यादिवशी. शेवटी माझ्या पाठां-तराच्या व सामूहिक आवाजाच्या भरवशावर आम्ही राष्ट्रगीताने मि. ईशानचं घर दणाणून सोडलं, आम्ही थांबलो तेव्हां टाळयांचा कडकडाट झाला. दुसरे दिवशी सकाळी साडेआठ वाजतां रेल्वे स्टेशनावर भेटणारच आहोत असं एक-मेकाला सांगून निरोप घेतला व आपल्या होस्टच्या घरी गेलो.

मी व मिसेस् सीग्रेन्ह घरी पोंचलो तेव्हां १०॥ वाजले होते. मि. नॉर्मन सीग्रेन्ह तो पर्यंत घरी आला होता. आम्हांला दार त्यानंच उघडलं. आणि 'मेरी'

म्हणून आपल्या पत्नीला मिठी मारली. त्यांचं ते मीलन पाहात मी 'हेल्पलेस स्पेक्टेटर' होऊन उभा राहिलो. दोनतीन मिनिटांनंतर मि. नॉर्मन माझ्याकडे आला आणि माझ्याशी हस्तांदोलन करून मला कोचाकडे घेऊन गेला. पंधरा वीस मिनिटं त्याच्याशी बोलून, पतिपत्नीत अडथळा नको म्हणून, मी माझ्या खोलीत निघून गेलो.

'सामाजिक प्रेम'

१६ तारखेला सकाळी आमचं डेरियन मधील वास्तव्य संपलं. मि. व मिसेस् सीग्रेव्ह व मुली मला पोचवायला स्टेशनवर आली होती. तसंच इतरांचे होस्ट्स्हि आले होते. मुंबईचा किनारा सोडल्या पासून प्रथमच पुन्हा कौटुंविक वातावरणात राहिलो होतो आणि डेरियनच्या लोकांनी आमच्याशी फार स्नेह केला होता त्यामुळे डेरियनच्या मंडळींचा निरोप घेताना थोडं जड वाटलं. पुन्हा आमच्याकडे या, भारताला जाण्यापूर्वी एकदा अवश्य भेटा, पत्रव्यवहार चालू ठेवा' असं सर्वांनी पुनःपुनः सांगितलं. सध्या तरी पत्रव्यवहार चालू आहे. सीग्रेव्हांची सर्वांत धाकटी मुलगी अजून माझी आठवण ठेवून आहे व आईला मधून मधून मला फोन करायला सांगत असते असं त्यांच्या पत्रावरून कळतं. डेरियनच्या कुटुंवियांचं हे प्रेम सामाजिक असेल. अगदी जिव्हाळ्याचं नसेल पण या परक्या देशात माणसाला तेहि पुरेसं वाटतं. आम्हा सर्वांचे चार दिवस डेरियनच्या कुटुंवात चांगले गेले.

डेरियन ही मध्यम वर्गीयांची वस्ती आहे. म्हणजे महिन्याला पांचशे ते हजार डॉलर्स कमविणाऱ्यांची वस्ती आहे. प्रत्येकाचं स्वतःचं घर आहे, मोटार आहे. कांहीच्या घरी दोन मोटारी आहेत. सर्वांना भरपूर मुलंबाळं आहेत. अमेरिकेत संततिनियमनाचा प्रचार आता सुरू झाला आहे, पण कॅथलिक पंथीय लोक त्याच्या विरुद्ध आहेत. आणि सर्वसामान्यपणे चारपाच मुलं असतातच. आठदहा मुलं असल्याची उदाहरणंहि पुष्कळ आहेत. डेरियनवासी याला अपवाद नाहीत.

डेरियनच कां निवडले ?

डेरियन मधील कुटुंवांची आमच्यासाठी निवड केली होती ती हेतुपूर्वकच असणार. मागे लिहिल्या प्रमाणे डेरियन-मेटकारा संवंध वगैरे कारणं तर आहेतच पण इतर सामाजिक कारणंहि असावीत. डेरियन मधील कुटुंवं सामान्यतः सुखी' त्यांचे संसार चांगले. घटस्फोटाचं प्रमाण पुष्कळच कमी स्त्रिया नोकरी न करणाऱ्या, घरगुती, व शहरी छचोरपणा पासून अलिप्त. अशाच प्रकारचं कुटुंव आम्हांला राहायला योग्य होतं. आही दहाजण दहा कुटुंबांत होतो व सर्वांचा

अनुभव सारखाच दिसला. प्रत्येकानं 'मी राहिलो ते कुटुंब तरी चागलं होतं. 'अमेरिकन' म्हणून आपली जी कांही कल्पना आहे ती तिथे दिसली नाही' असंच सांगितलं. अर्थात् यावरून नियम ठरविता येणार नाही. अमेरिकन कुटुंबा विषयी आपली जी कल्पना आहे ती ७५ टक्के खरी आहे. कांही अपवादात्मक 'कम्युनिटीज्' (इथे प्रत्येक वस्तीला किंवा गांवाला कम्युनिटी म्हणतात) सोडल्या तर कुटुंबं फार विस्कळीत झाली आहेत. मात्र अमेरिकन सिनेमात जे जीवन दाखविलं जातं तसं प्रत्यक्षात नाही. ती अतिशयोक्ति आहे. आपले सिनेमा पाहून आपल्या सामाजिक व कौटुंबिक जीवनाची कुणी कल्पना करील तर कितपत योग्य होईल ? पुष्कळ अमेरिकनांनी आम्हांला हेच सांगितलं. 'आमचे चित्रपट हे आमच्या जीवनाचं प्रतिबिंब नव्हे' असं ते म्हणतात. इथे चित्रपटावर फारसं नियंत्रण नाही. तसं भारतात आहे असं मी सांगितल्यावर 'How wise is your government ? I wish that is done here' असे उद्गार बऱ्याच जणांनी काढले. जाणत्या लोकांना ह्या गोष्टीची चिंता आहे. मात्र कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये अनास्था दिसते. सध्या जी मौजमजा त्यांना करायला मिळते ती बंद होईल असं कांही करायला ते तयार नाहीत. एका विद्यार्थ्याशी सहज या बाबतीत माझ्या मित्रानं बोलणं केलं तर तो अगदी सहजपणे म्हणाला, " Oh, chastity and virginity have no value in America. "

येल विद्यापीठ

डेरियनच्या मंडळींचा निरोप घेऊन आम्ही न्यू हॅवन्स या शहरी सुप्रसिद्ध येल युनिव्हर्सिटीत गेलो. अमेरिकेत येल जुनी का हार्वर्ड असा एक वादाचा प्रश्न आहे. दोन्ही विद्यापीठं सर्वांत जुनी आहेत हे मात्र खरं. येल विद्यापीठाचं आवार व इमारतींचा जुनेपणा पाहून ऑक्सफर्डची आठवण झाली. आम्ही गेलो त्यावेळी उन्हाळ्याची सुटी असल्यामुळे वर्ग बंद होते. तिथे परदेशीय विद्यार्थ्यांसाठी एक सेमिनार होता त्याला हजर राहण्यासाठी आम्ही गेलो होतो. दुपारच्या जेवणाच्या वेळी मिसेस् एलिनार रूझवेल्ट आल्या होत्या व त्यांच्याशी प्रश्नोत्तरं झाली. निरनिराळ्या देशातील सुमारे दोनशे विद्यार्थी उपस्थित होते. अमेरिकन नीग्रोच्या प्रश्नापासून तो परराष्ट्रीय धोरणा पर्यंत सर्व प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले. आणि सर्वांची अगदी शांतपणानं व बरीच समाधानकारक उत्तरे बाईंनी दिली. नीग्रोंच्या प्रश्नावर मात्र कुणालाहि समाधानकारक उत्तर देतां येत नाही. बहुतेक-जण कांहीसे 'अपॉलॉजेटिक' होतात. मिसेस् रूझवेल्टलाहि तसंच करावं लागलं.

१६ ते २० ऑगस्ट या काळातील आमचा कार्यक्रम डॅन्फोर्थ फाउंडेशननं निश्चित केला नव्हता. आणि ऐनवेळी आम्हाला कळवण्यात आलं की 'या चार दिवसात तुम्ही आपल्या मना प्रमाणे करा.' आम्ही विचार केलेला नव्हता

आणि तावडतोब निर्णय घेणं भाग होतं. आम्ही येल् विद्यापीठाच्या लॉनवर झाडाखाली बैठक भरविली आणि थोड्याशा चर्चे नंतर निर्णय घेतला. आमच्या पैकी तिघेजण तीन निरनिराळ्या ठिकाणी गेले व बाकीचे आठजण आम्ही शिकागोला जायचं ठरवून निघालो.

न्यूयॉर्क ते शिकागो

न्यू हॅवन्सहून सर्वजण परत न्यू यॉर्कला आलो. तिथून आमची तात्पुरती फाटाफूट झाली. न्यूयॉर्क ते शिकागो हे अंतर सुमारे नउशे मैल आहे आणि तिकिटाला ४३ डॉलर्स पडतात. सामान न्यायला हमाल नसतो त्यामुळे आपली बॅग आपल्यालाच वाहून न्यावी लागते. आमच्या जवळ एकेकच बॅग होती तरी ओझं बरंच होतं. आणि लांबच लांब प्लॅटफार्मवरून चालत जावं लागायचं. वाटेत एक दोन ठिकाणी थांबल्याशिवाय मुक्कामाला पोचणं कठीणच होत असे.

आगगाडीत जागा मात्र भरपूर असते. पहिला व दुसरा असे दोनच वर्ग असतात. पहिल्या वर्गाच्या डब्यात दोनदोन बर्थची एक केबिन असते आणि दुसऱ्या वर्गाच्या डब्यात बसमधे असतात तशा दोनदोन सीट्स असतात आणि टेकायचा भाग कमी अधिक झुकता करता येतो. त्यामुळे सीटवर बसून मागे चांगले रेलून झोपता येतं. सामान ठेवायला सीटच्या वर बर्थ असते आणि कोट अडकवायला हँगर असतो. सामानाचा डोंगर कुणा जवळच नसतो आणि सीट्स-हून जास्त प्रवासी नसतातच तेव्हां गर्दी व अडचण, धक्काबुक्की वगैरे कांही नाही. डब्यात पिण्याच्या पाण्याची सोय असते व गाडीलाच जोडून असलेल्या कॅफे मधून खाण्यापिण्याचे पदार्थ डब्यात विकायला येतात. एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जायला वाट असते तेव्हां एका ठिकाणी जागा नसेल तर दुसऱ्या कुठल्याहि डब्यात जाता येतं. तिकीट चेकर सारखा डब्यातून फिरत असतो. तो प्रवाशांची तिकीटं डब्यातच घेतो. स्टेशनवर उतरल्यावर तिकीट दाखवायची भानगड नाही. सर्व गाड्या विजेवर चालतात आणि किमान ताशी ७० मैल वेगानं धावतात. बराच वेळ धावल्या नंतर थांबतात. आणि हा मुक्काम मात्र चांगला १५ मिनिटांचा असतो. त्यामुळे प्रवाशांना उतरायला व बसायला घाई होत नाही. इतक्या सर्व सोयी असूनहि रेल्वे घाटयात आली आहे.

आमच्या गाडीनं न्यूयॉर्क स्टेशन सोडलं व थोड्याच वेळात एक मुलगी उशा घेऊन आली. आम्हांला आधी कांही कळलं नाही पण आजूबाजूचे प्रवासी एकेक उशी घेऊं लागले मग आम्हीहि ३५ सेंट देऊन एक उशी रात्रीसाठी भाड्यानं घेतली. उशीमुळे झोपण्याची आणखी चांगली सोय होते. बसमधे सुद्धा उशा 'येतात.'

'बफेलो'

प्रत्येक डब्यात त्या मार्गावरील रेल्वेचा नकाशा असतो. आमच्या पांडेजीनं नकाशा पाहून बफेलो स्टेशनाचा व नायगारा धबधब्याचा शोध लावला, आणि रात्री तीन वाजता येणाऱ्या बफेलो स्टेशनवर उतरून नायगारा धवधवा पाहावं असा प्रस्ताव मांडला. कांही कारणानं आम्ही पांडेवर थोडे नाराज झालो होतो. म्हणून त्याच्या सूचनेकडे कुणी विशेष लक्ष दिलं नाही. आणि उशीच्या सहाय्यान गुंगायला लागलो. पुन्हा अकरा वाजता पांडेनं सर्वांना जागं केलं आणि तोच प्रस्ताव मांडला. थंडी चांगलीच कडकली होती. दिवसभराच्या थकव्यानं झोप येत होती. व रात्री तीन वाजता झोपमोड करून थंडीत बफेलो (नांवहि चांगलं नाही) स्टेशनवर उतरावं या कल्पनेन अंगावर काटा येत होता. म्हणून आम्ही पांडेला सांगितलं, 'आम्ही झोपणार. तूं जागा राहून ३ वाजता आम्हांला उठवशील तर बफेलो स्टेशनवर उतरू !' तो कसला जागतो म्हणून आम्हीहि झोपलो. पण अडीच वाजता पांडेनं सर्वांना जाग केलं आणि उतरायची तयारी करा म्हणून सांगितलं. आता उतरल्या शिवाय भागच नव्हतं. पांडेची चिकाटी पाहून आम्हीहि प्रसन्न झालो होतो. तीन वाजता थंडीत कुडकुडत बफेलो स्टेशनवर उतरलो. मागे एकदा पंढरपूर स्टेशनवर साहित्य संमेलनाच्या निमित्तानं असेच थंडीत कुडकुडत पहाटे उतरलो होतो त्याची मला एकदम आठवण झाली. आणि त्या बरोबर नागपूरला कुटुंबीय मंडळीत मी जाऊनहि आलो.

बफेलो स्टेशनाच्या वेटिंगरूममध्ये गेलो मात्र सर्व थकवा नाहीसा झाला. फारच प्रशस्त व सोयिस्कर वेटिंगरूम आहे. सामान ठेवायला ऑटोमॅटिक लॉकर्स आहेत. पंचवीस सेंटचं नाणं फटीतून टाकलं की लॉकर उघडतं. सामान आत ठेवून कुलूप लावून किल्ली आपल्या बरोबर घ्यायची. बाथरूममधे जाण्यासाठी सुद्धा दहा सेंटचं नाणं टाकून दार उघडावं लागतं. तिथे फोटो काढण्याचेहि एक यंत्र आहे. केबिनमधे जाऊन आपल्याला हवी ती पोझ घेऊन बसावं, फटीतून पंचवीस सेंटचं नाणं टाकावं. खट् खट् खाड् खाड् असे आवाज व्हायला लागतात आणि दोन मिनिटांत फ्रेम केलेला फोटो आपल्या पुढच्या तबकडीत पडतो. माझ्या जवळ असा फोटो आहे. अर्थात् फोटो फारसा चांगला निघत नाही. आणि चांगल्या फोटोसाठी तो कुणी काढवीतहि नाही.

'नायगारा' धबधबा

सकाळी सहा वाजता बसनं नायगारा शहराला गेलो. बफेलो पासून सुमारे तीस मैल अंतरावर आहे. नायगारा नदी अमेरिका आणि कॅनडा यांच्या सरहद्दीवर आहे. नदीच्या दोन्ही बाजूवर नायगारा नांवाची शहरं आहेत. अमेरिकेतल्या

शहराला नायगारा न्यूयॉर्क व कॅनडातल्याला नायगारा ओंटारिओ म्हणतात. अमेरिकतल्या नायगारा शहराच्या बस स्टॉपवर आम्ही उतरलो व आता काय करावं याचा विचार करीत होतो तोच 'मे आऽऽऽ ल्यूऽऽ' (May I help you) असा एका महिलेचा आवाज कानी पडला. अमेरिकेत हा अनुभव पुष्कळ ठिकाणी येतो. दुकानात जा, हॉटेलात जा, सडकेला विचार करीत उभे राहा. कुणीतरी 'मे आऽऽऽल्यूऽऽ' म्हणतंच. नायगाराच्या त्या महिलेनं खरोखरच उपयुक्त माहिती दिली. तिच्या या सांगण्या प्रमाणे जवळच असलेल्या एका टूरिस्ट एजन्सीच्या ऑफिसात गेलो. तिथे प्रत्येकी पाच डॉलर्स प्रमाणे आठ सीट्सची एक स्टेशन व्हॅगन ठरवली व धवधवा पाहायला निघालो. ही टूरिस्ट एजन्सी वसेस्, कार्स व स्टेशन व्हॅगन्स मधून प्रवाश्यांना सर्व दाखवून आणते. गाडीचा ड्रायव्हर गाइडचंहि काम करतो.

नायगारा धवधवा अमेरिकन व कॅनेडियन अशा दोन्ही बाजूंनी पाहायचा असतो. कॅनेडियन बाजूनं दिसणारा धवधवाच सर्वांत मोठा आहे. आम्ही प्रथम अर्थात् अमेरिकन बाजूच्या धवधव्या जवळ गेलो. ड्रायव्हरनं हा इथे जवळच धवधवा आहे असं सांगितलं पण आम्हांला कुठेच धवधवा दिसेना. आपली कल्पना अशी असते की समोर उंच पहाडावरून पाणी पडत असेल. नायगारा धवधवा तसा नाही. जमिनीच्या पातळी वरून नायगारा नदी वाहत जाऊन खाली दरीत कोसळते आणि जमिनी खाली धवधवा तयार होतो. नदीच्या काठावर उभं राहून खाली धवधवा पाहावा लागतो. अपेक्षित कल्पने पेक्षा वेगळं दृष्य पाहून थोडी निराशा झाली. पण जे दिसलं ते कांही कमी प्रेक्षणीय नव्हतं. पाणी खाली कोसळत असल्यामुळे आवाजहि फारसा होत नाही, धवधव्या जवळ उभं राहून चांगलं बोलता येतं. आपल्या बाजूनंच पाणी वाहात जाऊन खाली धवधव्याचं स्वरूप धारण करतं.

'हॉर्स शू फॉल'

अमेरिकन बाजूला असलेला धवधवा सुमारे १५० फूट रुंद आहे. येवढं एकच ठिकाण अमेरिकन बाजूनं पाहण्या सारखं आहे. तिथून आम्ही पूल ओलांडून कॅनेडात गेलो. आम्ही दोनतीन तासांसाठीच कॅनेडात गेलो पण व्हिसा वगैरे सर्व भानगडी कराव्या लागल्या. कॅनेडात अनेक ठिकाणं पाहण्यासारखी आहेत. तिकडून दिसणारा सर्वात मोठा धवधवा Horse Shoe Fall म्हणून प्रसिद्ध आहे. कारण तो घोडयाच्या नालीच्या आकाराचा आहे. याची उंची १६० फूट व रुंदी ३००० फूट आहे. इथे पाणी बऱ्याच वेगान पडतं त्यामुळे घुमल्या सारखा आवाजहि होतो आणि पाण्याच्या तुषारांनी धुकं पसरल्या सारखं होऊन वारा असल्यास अर्धा फर्लांगभर पाऊस पडल्या सारखं पाणी पडत

अनुक्रमणिका

असतं. फारच भव्य देखावा आहे. १६७८ मधे फादर लुई हेनेपिन यानं प्रथम या धबधब्याचा शोध लावला म्हणतात. धबधबा पाहून तो स्तिमित झाला आणि त्यानं ईश्वराची प्रार्थना केली आणि परत जातांना 'The Universe does not afford its parallel' असे उद्गार काढले असं म्हणतात. निसर्गाचं येवढं मोठं वैभव पाहिल्या नंतर भक्तिभाव उत्पन्न होणं साहजिक आहे. अनेकांनी तिथे भक्तिभावानं प्रार्थना केल्या म्हणतात. कां कुणास ठाऊक माझ्या मनात भक्तीची भावना निर्माण झाली नाही. कदाचित् हा धबधबा भारतात असता तर तशी भावना निर्माण झाली असती.

'दक्षिणा'–जुनी व नवी

कॅनेडियन बाजूला नायगारा नदीच्या काठी अनेक प्रेक्षणीय स्थळं आहेत. एका ठिकाणी लिफ्टनं पांचशे फूट खाली जाऊन नदीच्या काठावर उभं राहून तिचा अवखळ प्रवाह पाहतां येतो. अेका ठिकाणी तारेवरून चालणाऱ्या लिफ्टनं नदी ओलांडता येते. आम्ही तिथे पोचलो त्या वेळी पलीकडून लिफ्ट परत येत होता. आणि इकडून जाण्यासाठी तिकीट काढून प्रवासी तयार होते. कांही जागा रिकाम्या होत्या म्हणून एक पोरगा लाऊडस्पीकर वरून ओरडून 'थोडयाच जागा राहिल्या, त्वरा करा' असं सांगत होता. हे पहा, ते पाहा, इथे तिकीट घ्या, ही वस्तू विकत घ्या असा आग्रहहि कांही ठिकाणी केला जातो. आपल्याकडे थोडा जास्त चिकटपणा दाखविला जातो येवढंच. पुढे एका ठिकाणी फुलांचं मोठं घडयाळ आहे. बगिच्यात मातीच्या डायलवर गवताचे आकडे उगविण्यात आले आहेत आणि दोन मोठे टिनाचे काटे विजेनं फिरवले जातात. घडयाळ बिनचुक वेळ दाखवतं. कांही ठिकाणी सुंदर बगीचे आहेत. एक मोठं विद्युत्पादन केंद्रहि बांधण्यात येत आहे. एका ठिकाणी पाण्यातून ज्वालाग्राही वायु येतो. तिथे पाण्याला जाळ लावून दाखविण्याची करामत करण्यात येते. प्रत्येक ठिकाणी तिकीट काढावं लागतं. नंतर दक्षिणा देण्या ऐवजी आधी द्यावी लागते आणि प्रसादा ऐवजी स्मरणवस्तु (Souvenir) घ्यावी लागते इतकंच.

जगप्रसिद्ध धबधबा पाहिल्याच्या समाधानानं आम्ही चार वाजतां बफेलो स्टेशनात परत आलो. दाढी, आंघोळ व जेवण करून रात्री ११ च्या गाडीनं शिकागोकडे रवाना झालो.

१८ ऑगस्ट रोजी सकाळी १०॥ वाजता शिकागो स्टेशनावर उतरलो. पाहतो तो स्टेशनावरील घडयाळात ९॥ वाजलेले. मग आम्हांला कळलं की न्यूयॉर्क व शिकागो यांच्या वेळात एक तासाचा फरक आहे. अमेरिकेत तीन 'टाईम झोन' आहेत–पूर्व, मध्य आणि पश्चिम, पूर्व आणि पश्चिम यांच्या वेळात

तीन तासांचा फरक आहे. न्यूयॉर्कमधे संध्याकाळचे सहा वाजले असतील तर सानफ्रान्सिस्को मधे दुपारचे तीन वाजलेले राहतील. आम्हांला शिकागोला एक तास घड्याळं मार्गे करावी लागली. शिकागोला कुठे जायचं हे ठरलेलं नव्हतं. शिकागो स्टेशनहि फारसं चांगलं वाटलं नाही. गजबजलेल्या वेटिंगरूममध्ये थोडा वेळ आम्ही सुन्नमनानं बसून राहिलो. मग इंटरनॅशनल हाऊसच्या व्यवस्थापकाला फोन केला. त्याने 'जागा आहेत या' म्हणून सांगितलं. लगेच दोन टॅक्सी करून आम्ही तिकडे गेलो. इंटर नॅशनल हाऊस शिकागोच्या ५९ व्या सडकेवर आहे. वाटेत आम्ही लेक मिशिगनच्या काठावरून गेलो. लेक मिशिगन हे शिकागोचं वैभव आहे. त्याला उगीच सरोवर म्हणायचं. पण तो लहानसा समुद्रच आहे. तीनशे मैल लांब व शंभर मैल रुंद असं ते गोड पाण्याचं सरोवर आहे. सरोवराच्या काठावरून जाताना मन प्रसन्न झालं.

इंटर नॅशनल हाऊस

इंटर नॅशनल हाऊसमधे शिरताच मन आणखी प्रसन्न झालं. भव्य आठ मजली इमारत, सुंदर व्यवस्था आणि प्रत्येकाला स्वतंत्र खोली पाहून प्रसन्नतेत आणखी भर पडली. नागपूर सोडल्या पासून जीवन कसं अगदी सामूहिक झालं होत. शिकागोच्या इंटर नॅशनल हाऊस मधे. स्वतंत्र खोलीत बसल्या नंतर किती तरी दिवसानी वैयक्तिक शांत जीवनाचा अनुभव मिळाला. तीन दिवस आता केवळ आराम करायचा म्हणूनहि समाधान वाटलं. नागपूर सोडल्या पासून खरी विश्रांति मिळालीच नव्हती. सारखी धावपळ व कार्यक्रम. आता तीन दिवस आमचे आम्ही मुख्यत्यार होतो.

इंटर नॅशनल हाउसच्या खालच्या मजल्यावर कॅफेटेरिया आहे. तिथे जाऊन एक ट्रे घ्यायचा व आपल्याला हवे असलेले पदार्थ घेत पुढे सरकायचं, शेवटी बिल घेणारी बाई असते तिला बिल देऊन ट्रे घेऊन मोकळचा असलेल्या कोणत्याहि टेबलाशी जाऊन बसायचं. जेवण झाल्या नंतर रिकाम्या ट्रे, ग्लास व बशा एका खिडकीत नेऊन ठेवायच्या. या व्यवस्थेमुळेहि बरंच मोकळं वाटलं. एकंदरीत तीन दिवस आमचे पूर्ण विश्रांतीत व मजेत गेले.

'विवाह समारंभ'

रोज शहरातून फेरफटका मारून कांही भाग पाहायचा, कांही जुजबी खरेदी करायची असा आमचा कार्यक्रम होता. १९ ऑगस्ट रोजी शिकागोच्या इंडियन असोशिएशननं भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा केला. एक अमेरिकन पत्रकार डेव्हिड कार्टसन मुख्य पाहुणे होते. त्यांचं भारत–अमेरिका संबंधावर फार

अनुक्रमणिका

चांगलं भाषण झालं. त्यानंतर भावगीत, नृत्य, वाद्यसंगीत संघगीत, भारतीय स्वातंत्र्य लढयावर आधारलेला शॅडोप्ले, वगैरे कार्यक्रम झाले. कार्यक्रमात भारतातील विवाहपद्धत नाटकरूपानं करून दाखविण्यांत आली. मौज म्हणजे महाराष्ट्रीय पद्धत निवडण्यात आली होती. मंगलाष्टके, होम, सप्तपदी व वधूवरांना भेटी देणं वगैरे सर्व प्रकार करून दाखविण्यात आले. वधूवरांना मुंडावळया बांधल्या होत्या आणि अंगात शर्ट नसलेले उघडे भटजीबुवाहि होते. आमच्या पूढच्या रांगेत एक अमेरिकन महिला बसली होती. ती वर्ध्याला सेवाग्राममधे एक वर्ष राहून आली होती. तिला या विधीची बरीच माहिती होती. तिला खूप मौज वाटली. इतरांनाहि प्रत्यक्ष लग्नसमारंभात उपस्थित राहिल्या सारखं वाटलं. शेवटी टागोरांच्या 'चांडालिका' नाटकाच्या इंग्रजी अनुवादातील दोन प्रवेश अमेरिकन हौशी कलावंतांनी करून दाखविले. सर्वात शेवटी भारत व अमेरिका यांची राष्ट्रगीतं म्हणण्यात आली. एकंदरीत कार्यकम चांगला झाला. भारतीयांनी केलेले कार्यक्रम क्वचितच चांगले होतात. पण हा बराच चांगला झाल्यामुळे समाधान वाटलं. एक गोष्ट मात्र खटकली. कार्यक्रमाची सुरवात वंदेमातरम्‌नं करण्यात आली पण त्यावेळी कुणी उभं राहीलं नाही. तशी सूचनाहि चालकांनी केली नाही. बसून राहणं कसंसंच वाटू लागल्यामुळे मी व माझ्या बरोबर पंजाबचा भाटिया असे आम्ही दोघे उभे राहिलो. हजार–बाराशे प्रेक्षकांच्या नजरा आमच्याकडे वळल्या पण आम्ही पर्वा केली नाही. आम्ही आपल्या पद्धतीनं वागलो याचं समाधान वाटलं. मागे एकदा नागपुरात एका थिएटरात 'जन गण मन' ची रेकॉर्ड लावण्यात आली होती. त्यावेळी आम्ही सर्व कुटुंबीय मंडळी असेच उभे राहिलो होतो या गोष्टीचं स्मरण झालं. कार्यक्रमा नंतर मी चालका पैकी अेकाला हे बोलून दाखविलं. 'ते खरं आहे पण अमेरिकनांना अधिकृत नसलेल्या राष्ट्रगीत गायनाच्या वेळी उभं राहायला कसं सागावं ?' असं तो म्हणाला. मी म्हटलं, 'आपण विनंती केली तर ते नक्कीच उभे राहतील. आपल्याला येवढी भानगड करायची नसेल तर वंदेमातरम् म्हणूच नये.' त्याला शेवटचा पर्याय सोपा वाटला.

नाना जोगांचे 'भारती'—

एक मनोविश्लेषणात्मक विवेचन

(मागील अंकावरून पुढे चालू)

लेखक—प्रा. म. बा. कुंडले, एम्. ए., एम्. एड्.

या मीमांसेनुसारच डॉक्टर आपल्या उपचार पद्धतीची योजना करतात. त्यांना भारतीच्या मनात दडपली गेलेली बंडखोर प्रवृत्ति जागृत करावयाची असते. जो मानसोपचारक रोग्याची विकृति दूर करण्याचा प्रयत्न करणार असतो, त्याच्या पूर्णपणे स्वाधीन रोग्याने व्हावयाला पाहिजे. त्यासाठी रोग्याला मानसोपचारकाबद्दल पूर्ण विश्वास वाटायला पाहिजे, व या सर्व पायऱ्या चढून जाण्यास्तव आधी त्याने रोग्याशी स्नेह प्रस्थापित केला पाहिजे, व तोहि रोग्याच्या कोणत्यातरी आवडीच्या व्यवसाया द्वारा! भारती पूर्णपणे जीवन—पराङ्मुख झालेली नसते. संगीत हा एकच विषय असा असतो की ज्याबद्दल तिला थोडेफार स्वारस्य वाटत असते. तेव्हा संगीताच्याच साह्याने तिच्याशी स्नेह जुळविण्याची शक्यता असते. परंतु डॉक्टरांना संगीत मुळीच येत नाही. म्हणून ते त्यासाठी रसिकलालची मदत घेतात. रसिकलालच्या प्रयत्नांमुळे भारती थोडी माणसात येऊ लागते. परंतु मध्यंतरी या प्रयत्नाला एक अनपेक्षित वळण मिळते. रसिकलाल हा हळुवार अंतःकरणाचा, डॉक्टरांच्याच शब्दात सांगायचे रत 'too soft', भावविवश व कवि वृत्तीचा तरुण असतो. भारतीहि तरुण! तिच्या दुःखाने त्याचे मन हेलावते, तो तिच्याविषयी सहानुभूति व्यक्त करतो. आपल्या कवितांची वही तिला देतो. त्यातील एका कवितेत तिच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करतो. ती कविता भावपूर्ण रीतीने गावूनहि दाखवतो. त्याच्या सहानुभूतिपूर्ण वर्तनाने ती त्याच्याकडे आकर्षिली जाते. त्याच्या त्या खळवळलेल्या मनःस्थितीच्या प्रवाहात—काव्यात—स्वतःचे प्रतिबिंब पाहते. तोहि स्वतःला आवरू शकत नाही. शेवटी ती आपले सर्वस्व त्याला अर्पण करायला तयार होते. तिच्या कोंडलेल्या, दडपलेल्या भावना—स्त्रीसुलभ प्रेमप्रवृति, काम प्रवृत्तीच्या द्वारे मोकळ्या होऊ लागतात. बंडखोर प्रवृत्तीऐवजी काम प्रवृत्तीच जागृत होते. अर्थात यात अस्वाभाविक असे काहीच नाही. मानसो-पचारपद्धतीत असे अनेकदा होत असते. रोगी हा डॉक्टरलाच प्रतिप्रेमिक

अनुक्रमणिका

(Lover-substitute) समजून त्यावर प्रेमाचा वर्षाव करू लागतो. त्यात, भारती ही तर तरुण, अतृप्त; रसिकलालहि तरुण, देखणा ! तेव्हा तिच्या बाबतीत हे अधिक स्वाभाविक आहे. परंतु अशावेळी हा प्रतिप्रेमिकच पक्का असायला पाहिजे. त्यादृष्टीने रसिकलाल हा अपात्र होता. अर्थात घडलेली ही गोष्ट अनपेक्षित नसली तरी डॉक्टरांना ती अपेक्षित नव्हती. कारण त्यांनी आपल्या कारण मीमांसेत दडपलेल्या कामवासनेला महत्त्व दिले नव्हते. उपचारांद्वाराहि त्याना जागृत करायची असते ती भारतीची बंडखोर प्रवृत्तीच ! कामप्रवृत्ति नव्हे. व्यावहारिक द्रृष्टया पतीच्या घरी राहूनहि वृद्ध पतीपासून तृप्त न होणारी प्रेमभावना—कामवासना दुसऱ्या एखाद्या तरुणाकडून तृप्त करून घेणे हीहि एक प्रकारची बंडखोरीच होय ! परंतु डॉक्टरांच्या मते ही खरी बंडखोरी नव्हे. उलट त्यांच्या मते ही एक स्वार्थ प्रेरित तडजोड—Adjustment आहे. त्यांच्या मते भारतीने—मार्तंडरावांनी तिच्यावर केलेला अन्याय वेशीवर टांगणे, साऱ्या जगाला ओरडून सांगणे, त्याबाबत समाजजागृति करणे, त्याविरुद्ध संघटना करणे, हे खरे बंड ! त्यानुसार अबोधमनात दडपली गेलेली तिची बंडखोर वृत्ति बोधमनाच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न करीत असताना डॉक्टर तिला म्हणतात, 'अग, ही तुझी कहाणी, हे सत्य, साऱ्या जगाला एकदा तरी सांग—एकदा तरी फुटू दे या सत्याला वाचा ! एकदा तरी खरं बोल !—ऊठ !—ओकून टाक ते सत्य एकदा ! अग, असा आकांत करून सोड की सारी स्त्रीजात खडबडून जागी होईल—तिला तिच्या परिस्थितीची जाणीव होईल ! सारी पुरुषजात हादरून जाईल ! त्यांचं डोकं ठिकाणावर येईल !'

परंतु डॉक्टर भारतीची ही बंडखोर वृत्ति जागृत करण्यास असमर्थ ठरतात. तिची विकृति निवारण करण्यात त्यांना अपयश येते. शेवटी भारतीची वाचा परत येते. परंतु ती मार्तंडरावांच्या मृत्यूमुळे—डॉक्टरांच्या उपचारांमुळे नव्हे. आपल्या अपयशाची डॉक्टर जी मीमांसा करतात ती मात्र अत्यंत महत्वाची व चिंतनीय आहे. ते म्हणतात, 'एखाद्या माणसातले दोष आपण आपल्या वैयक्तिक सामर्थ्याच्या बळावर घालवण्याचे प्रयत्न करतो—आपल्या हे ध्यानातच रहात नाही की आजच्या माणसाचा पिंड गेल्या शेकडो पिढ्यांच्या संस्कारांनी, रुढींनी, तसाच आजच्या आचारविचारांनी कितीतरी बडवलेला, घडवलेला, वेढलेला असतो ! म्हणूनच त्याच्या आत्म्याला स्पर्श करून जागृत करायला गेलो की या भक्कम संस्कारांच्या आचारा-विचारांच्या भिंताडावर आपण आदळतो—तिथंच आदळत राहतो ! ही भिंताडं पाडणं एकटयादुकटयाचं का काम आहे .तुमच्या सबंध पिढीची शक्तिवृद्धि एकवटून खर्ची पडेल तेव्हा भारतीसारख्या कोटयवधि अबलांचं बळहि पुरुष जातीला उपकारक होईल !'

त्यांच्या म्हणण्याचा एकंदर आशय असा–कोणत्याहि व्यक्तीच्या विकृतीला कारण केवळ त्या व्यक्तीची असमर्थता किंवा दोष नसतात–तर सामाजिक व आर्थिक परिस्थितीहि तितकीच कारणीभूत असते–ज्या परिस्थितीमध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा, इच्छावासनांचा कोंडमारा होतो, आपल्या अनेक प्रवृति तिला दडपून टाकाव्या लागतात, नाइलाज म्हणून अत्यंत अप्रिय व घृणास्पद परिस्थिती पुढेहि शरणागति पत्करावी लागते, मनाला यत्किंचितहि न पटणारी–असह्य अशी तडजोड करावी लागते. म्हणूनच व्यक्तीची विकृति दूर करण्यासाठी मानसोपचारकाने केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर विसंबून चालणार नाही किंवा केवळ विकृत व्यक्ति वरच आपले सर्व लक्ष केंद्रित केरून भागणार नाही. तर ज्या परिस्थितीतून व्यक्तीचा पिंड तयार झाला आहे व ज्या परिस्थितीमुळे ही विकृति निर्माण झाली आहे त्या परिस्थितीत–समाज व्यवस्थेत परिवर्तन होणे, बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीवर–मार्तंडरावांसारख्या गृहस्थाशी लग्न करण्याची पाळी आली–याचे कारण तिचे दारिद्रच–आर्थिक विषमता किंवा संपत्तिप्रधान समाजव्यवस्था. या परिस्थितीला भारती विरोध करूं शकत नाही–परिस्थितीविरुद्ध वंडहि करू शकत नाही याचे कारण सामाजिक रुढि, नीति, संकेत व तिचा एकाकीपणा ! जोपर्यंत अशी परिस्थिति आहे तो पर्यंत भारतीसारख्या स्त्रियांची अशीच कुचंबणा होणार व अशा विकृति होतच राहणार ! अर्थात अशा विकृति न होण्यास किंवा झालेल्या विकृति दूर करण्यास केवळ मानसोपचार अपुरा आहे. त्यासाठी सामाजिक क्रांति अपरिहार्य आहे ! व ही गोष्ट मानसोपचारकांनी ध्यानात घ्यायला हवी. न घेतल्यास मानसोपचारकांच्या पदरी अपयशच येणार !

फ्राईड, अॅडलर, युंग, केरेन हॉर्नी इत्यादि मानसोपचारकांनी प्रचलित केलेल्या व सध्या रुढ असलेल्या अनेक मानसोपचारपद्धतीत व लेखकाने प्रतिपादिलेल्या या दृष्टिकोनात हा एक मोठा फरक आहे. उपरिनिर्दिष्ट सर्व मानसोपचारकांच्या मते व्यक्तीच्या विकृतीचे मूळ व्यक्तिमनात किंवा व्यक्तीच्या असमर्थतेतच असते. जेव्हा व्यक्ति विशिष्ट प्रकारच्या संघर्षाला तोंड द्यायला असमर्थ ठरते तेव्हा विकृतीचा संभव निर्माण होतो. या विकृतींना सामाजिक परिस्थिति, रुढि, नीतिनियम, पारंपारिक संकेत इत्यादि अनेक गोष्टी कारणीभूत होऊ शकतात–त्या विचारातहि घेतल्या जातात. परंतु त्यात प्रामुख्याने व्यक्तिमनाचाच विचार केला जातो. उपचारांचेहि स्वरुप लक्षात घेतल्यास–या सर्व उपचारपद्धति निःसंशय व्यक्ति केंद्रित आहेत असे दिसून येईल. त्यात–बोधात्म्याचे क्षेत्र, त्याचा दृष्टिकोण अधिक व्यापक, संग्राहक करणे–जेणे करून बोधात्मा अबोधात्म्याच्या इंद्रियजन्य व सुखलोलुप वासना, ध्येयात्म्याच्या नैतिक प्रेरणा

व प्रत्यक्ष परिस्थितीच्या गरजा या सर्व गोष्टींचा समन्वय साधू शकेल, या सर्व घटकांमध्ये सामंजस्य प्रस्थापित करू शकेल ! — याच दृष्टीने व्यक्तिमनाचे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. उपचारांचे क्षेत्र व्यक्तिमनापुरतेच मर्यादित राहते. सामाजिक परिस्थिति, रुढि, चालीरीति इत्यादि व्यक्तिबाह्य गोष्टी विचारांत घेतल्या जात नाहीत. त्यामध्ये बदल, परिवर्तन इत्यादि गोष्टी मानसोपचारकाच्या कक्षेत येत नाहीत. उलट प्राप्त परिस्थितीतच आपल्या इच्छावासनांना यशस्वी रीतीने मुरड कशी घालता येईल, त्यांचे समाधान कसे करून घेता येईल, याचाच मार्ग तो व्यक्तीला दाखवून देत असतो. व अशा रीतीने परिस्थितीशी अनुयोग (Adjustment) साधण्यास तो तिला मदत करीत असतो. त्यासाठीच व्यक्तीचें मानसिक सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. या दृष्टीने या विविध उपचार पद्धति व्यक्तिकेंद्रित व समाज-परिस्थित निरेपक्ष अशा आहेत. याउलट विकृति निवारणार्थ केवळ विकृत-व्यक्तिमनाचाच विचार करून चालणार नाही, त्यासाठी समाज-परिवर्तन देखील आवश्यक आहे हा लेखकाचा दृष्टिकोण ! व तो वैशिष्टचपूर्ण आहे. प्रचलित मानसोपचार पद्धतींत सामाजिक बाजूची जी आजवर उपेक्षा करण्यात आली, ही त्या शास्त्र व पद्धतींमधील मोठी उणीव आहे. हे लेखकाने दाखवून दिले असून मानसोपचार-शास्त्र व पद्धतीला सामाजिक अधिष्ठानाची आवश्यता आहे, मनोविकृतीचा विचार सामाजिक दृष्टिकोनातून व्हायला पाहिजे व तिची उपचार पद्धतीहि केवळ व्यक्तिनिष्ठ न राहता समाजनिष्ठ असायला पाहिजे हे जे प्रतिपादन केले आहे ते निःसंशय अतिशय महत्वपूर्ण व मौलिक स्वरुपाचे आहे.

नाटकातील मानसशास्त्रीय समस्येचे येथवर स्पष्टीकरण केल्यानंतर तत्संबंधी काही मतभेदाचे मुद्देहि पुढे मांडणे अनुचित होणार नाही.

मनोविश्लेषण शास्त्रानुसार ध्येयात्म्याला न पटणारी व त्यामुळे बोधात्म्यालाहि बाह्यतः अप्रिय व असह्य होणारी कोणतीहि इच्छा किंवा प्रवृत्ति न कळत (unconsciously) अबोधमनात दडपली गेली (Repression) तर तिच्यापासून विकृति निर्माण होण्याचा संभव होतो. अशा वेळी संघर्ष चालू असतो तो अंतर्मनात, अबोधमनात ! बोधमनाला त्याची जाणीव नसते. भारतीच्या मनात, तिचा स्वाभिमान व बंडखोर प्रवृत्ति आणि तिची स्वार्थत्यागी वृत्ति यांचा जो संघर्ष चालला होता तो बोधमनाच्या पातळीवर ! त्याची पूर्ण जाणीव भारतीला होती तद्वतच तिने आपली बंडखोर प्रवृत्ति व आपला स्वाभिमान दडपून टाकला तोहि जाणीवपूर्वक (consiously) एवढेच नव्हे तर वर्षभर सतत विचार केल्यानंतर ! हा संघर्ष किंवा ही दडपणूक (suppression) भारतीला

अज्ञात नव्हती. स्वत: जाणीवपूर्वक एखादी प्रवृत्ति दडपून टाकल्यानंतर व्यक्तीला मनस्ताप होईल, तिचे मानसिक स्वास्थ्य नाहीसे होईल, चिडचिडेपणा, त्रासिकपणा, मानसिक ताण इत्यादि अनेक प्रकार घडतील परंतु त्यामुळे (Shock) बसल्याप्रमाणे अगदी अचानकपणे–भारतीच्या बाबतीत घडली तशा प्रकारची विकृति (paralysis of the nerves) घडून येण्याची संभवनीयता नाही. म्हणून ज्या पार्श्वभूमीवर भारतीच्या ठिकाणी ही विकृति निर्माण झाली ती शास्त्रीय कसोटीला उतरण्यासारखी नाही.

भारतीशी स्नेहसंपादन करण्यासाठी डॉक्टर रसिकलालचे साह्य घेतात ही गोष्ट ठीकच आहे. दोन समवयस्क तरुण–तरूणी एकत्र आल्यानंतर त्यांच्या मनात प्रेमभावनेचा प्रादूर्भाव होणे अगदी स्वाभाविक असले तरी हे डॉक्टरांच्या उपाययोजनेत बसण्यासारखे नव्हते त्यांना तिचा स्वाभिमान, तिच्यातील बंडखोर प्रवृत्ति जागृत करावयाची होती परंतु त्याऐवजी कामप्रवृत्तीच जागृत झाली. त्यामुळे त्यांची सगळी योजनाच फिसकटून गेली. रसिकलाल व भारती यांचा अशा रीतीने संबंध आणल्यानंतर असा प्रकार होण्याची शक्यता सामान्य माणसालाहि जर दिसू शकते तर ती डॉक्टरांसारख्या मानसशास्त्रज्ञाला दिसून आली नसावी असे म्हणता येत नाही. बरे, ही गोष्ट त्यांना अगदीच अनपेक्षित नव्हती तिसऱ्या अंकात ते मार्तंडरावांना म्हणतात, 'हाच तो निसर्गाला फी देण्याचा प्रसंग!' व ही धोक्याची सूचना त्यांनी मार्तंडरावांना पहिल्या अंकातच दिली होती डॉक्टरांना जर हा प्रकार घडू द्यायचा नव्हता व भारतीशी स्नेहसंबंध जुळविण्यासाठी रसिकलालचे साह्य घेणे अपरिहार्य वाटत होते तर त्यांनी हे आपल्या उपस्थितीत, निदान निश्चित मार्गदर्शन व नियंत्रणाखाली करवून घ्यायचे होते. या उलट त्यांनी ही केस रसिकलालच्याच स्वाधीन केल्यासारखे दिसते. दुसऱ्या अंकात ही चाहूल त्यांना लागल्यानंतर ते रसिकलालला त्यापुढे तिथे येण्याची बंदी करतात. परंतु तीहि तोंडीच! त्याबद्दल कटाक्षाने दक्षता घेत नाहीत तिसऱ्या अंकांत मार्तंडरावांचा वैताग, संताप पाहिल्यावर ते विचारतात, 'तो गाढव आला होता का पुन्हा इथं?' व सगळा प्रकार त्यांच्या ध्यानात येतो. यावरून डॉक्टरांचा हा निष्काळजीपणाच त्यांना भोवला असे म्हणावे लागते. पुढे डॉक्टरांना आलेले अपयश दाखविण्याकरता लेखकाने हा कच्चा दुवा ठेवला असे म्हटले तरी ते समर्थनीय नाही. डॉक्टरांची ही वागणूक तज्ञ मानसोपचारकाला व शास्त्रीय तांत्रिक पद्धतीला मुळीच शोभण्यासारखी नाही.

शेवटला मुद्दा! श्री. जोगांनी प्रतिपादन केलेली सामाजिक क्रांतीची आवश्यकता ही मनोविकृतीच्या निर्मितीला आळा घालण्यास अगर विकृति-निवारणार्थ पूरक म्हणून निर्विवाद उपयोगी ठरत असली तरी एक शास्त्रीय

सिद्धांत म्हणून तिचा स्वीकार कितपत होऊ शकेल याबद्दल शंका वाटते. व्यक्ति-मने इतकी भिन्नभिन्न स्वरुपाची आहेत, त्यांच्या प्रवृत्ति, इच्छा–वासना, आवडी–निवडी इतक्या विविध व वैचित्र्यपूर्ण एवढेच नव्हे तर कांही वेळा इतक्या विरोधी स्वरुपाच्याहि असतात की कोणतीहि आदर्श समाजव्यवस्था निर्माण केली तरी तीत कांही व्यक्तींच्या काही प्रवृतीचा कोंडमारा होणे, त्यांची कुचंबणा होणे अटळ आहे. सर्व व्यक्तींना मनःपूत वागणूकीचे स्वातंत्र्य मिळेल, आपल्या सर्व प्रकारच्या आवडीनिवडींचे व इच्छावासनांचे त्यांना सुखेनैव समाधान करून घेता येईल अशी समाजपरिस्थिति कल्पनेतच संभवू शकते. प्रत्येक व्यक्तीला कोणत्याना कोणत्या बाबतीत आपल्या मनाला मुरड घालून परिस्थितीशी तड-जोड करावी लागणारच! आयुष्य ही एकप्रकारची यशस्वी तडजोडच आहे. भारतीचेच उदाहरण घेतले तर भारतीपुढे दोनच पर्याय होते. एकतर मार्तंड-रावांना सरळसरळ विरोध करून परिस्थितीविरुद्ध बंड उभारणे किंवा दुसरा पर्याय मन मारून त्यांच्याबरोबर संसार करणे! यापैकी एकहि गोष्ट तिला साधली नाही. भारती ही बंडखोर आहे असे डॉक्टरांनी म्हटले असले तरी ती पुरेशी बंडखोर नाही. तसे असते तर तिने मार्तंडरावांना विरोध केला असता, बंड करून समाजजागृति करण्याचा प्रयत्न केला असता. दुसरे असे–भारतीच्याच परिस्थितीत सापडलेल्या सर्वसाधारण स्त्रियांपैकी बहुतेकींना दुसरा पर्याय स्वीकारून–मन मारून जीवन जगावे लागते व त्या जगत असलेल्या आपण पाहतो. अर्थात त्यांनी स्वीकारलेली जीवनप्रणाली ही कोणत्याहि दृष्टीने स्पृह-णीय नसली तरी निदान भारतीच्या या मनोविकृत व दुर्दैवी अवस्थेपेक्षा समाधान-कारकच ठरते. व अशा स्त्रियांमध्ये स्वतःचे मन मारून जीवनाशी तडजोड साधण्याचे मनःसामर्थ्य भारतीपेक्षा अधिक आहे असे म्हणावे लागते. अतएव प्राप्त परिस्थितिनुसार आपल्या मनःप्रवृत्तींना मुरड घालण्यास आवश्यक असलेला मनोनिग्रह व मानसिक शक्ति प्राप्त करून घेणेच यशस्वी जीवनाच्या दृष्टीने अधिक फलदायी ठरते. मानसोपचारक देखील हाच प्रयत्न करीत असतात.

अशा कांही मतभेदात्मक मुद्यांचा टीकात्मक स्वरुपात जरी मी निर्देश केला असला तरी त्यामुळे नाटकातील अर्थगांभीर्य व त्याची महत्ता यत्किंचितहि कमी होत नाही. हे मनोविश्लेषणाचे युग आहे. कथा–कादंबऱ्या–नाटके यामधून पात्रांच्या मनोविश्लेषणावर आज अधिक भर दिला जात आहे. त्यामुळे व्यक्ति-चित्रणात एका नव्या परिमाणाची (Dimension) भर पडली आहे. वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, मंगेश व सरिता पद्की, तारा वनारसे इत्यादि लेखकांच्या नाट्यकृतींचा मनोविश्लेषणात्मक कृति म्हणून टीकाकाराकडून गौरवहि

(पृष्ठ ३२ वर)

सूक्ति सुधा

(सव्वीस सूक्तींचा पहिला हप्ता नोव्हेंबर १९६१ च्या युगवाणीत प्रसिद्ध झाला आहे. उरलेल्या एकोणीस सूक्तींचा हा दुसरा हप्ता आज देत आहे.)

आरसा

(हमने तुमको देखा है मिसाले आइना
पीठपीछे कुछ हो तुम और रूबरू कुछ और हो)

ओळखतो तुज पूर्ण मी की तूं मुकुरसमान
तोंडदेखली एक तूं ! पाठमोरि तूं आन ! (२७)

(अपनी सूरत आइनामें तुम न देखो हरघडी
कर दिया, देखो, इसी सूरतने दीवाना हमें)

आरशात निज रूप तूं पहा न वारंवार
तेच देखुनी मी करी वेडे वेडेचार ! (२८)

(क्या गौरसे, ऐ जानेजहाँ, देख रहे हो ?
तुमसा कोई आइनाके अंदर तो नहीं है ?)

आरशात बघसी असे कां इतुके निरखून ?
नाहीना तुजसे कुणी बसले आंत दडून ? (२९)

चुंबन

(कंदे लवका उनके बोसा बेतकल्लुफ ले लिया
गालियां खाई बलासे, मुंह तो मीठा हो गया)

सुधाधराते चुंबिले सहज विना आयास
शिव्या खावया लागल्या, झाले तोंड मिठास (३०)

(एक बोसा के तलबगार हैं हम
और मांगे तो गुनहगार हैं हम)

एक हवें चुंबन, असू इच्छुक त्याचे फार
आणिक कांही मागु तर गुन्हेगार ठरु ठार ! (३१)

अनुक्रमणिका

पत्रव्यवहार

(खत, किताबतकी सदा रस्मको जारी रखना
भूल जाना न हमें, याद हमारी रखना)
चालू द्या चिर रुचिर हा शुभ पत्रव्यवहार
विसरु नका, सय आमुची ठेवा हृदयि अपार (३२)

प्रेमाचा रोग

(उस मरज़को मर्जेइश्क कहा करते है
न दवा होती है जिसकी न दुआ होती है)
'प्रेमाचा रोगी' असे म्हणती त्या रोग्यास
औषध ज्यास नको, नको ज्यास नवस सायास (३३)

(उनके देखनेसे जो आ जाती है मुंहपर रौनक
वह समझते है कि विमारका हाल अच्छा है)
प्रसन्नता जी ये मुखी तद्दर्शन होतांच
वाटे रोग्याची दशा तिजला उत्तम साच ! (३४)

(दिखा दे तुमको कैसा इश्कका आजार होता है
कलेजा थाम लोगे, वीमार की सूरत)
दावू का असतो कसा प्रेमाचा आजार ?
रोग्याचे मुख पाहता – होइ कलेजा गार ! (३५)

यौवन

(गले मिलने के इन काफिर हसीनों से यही दिन है
जवानी जब गले मिलती हो आ आकर लडकपनसे)
गळ्यात कौमार्याचिया यौवन घाली हात
गळा गळी घालायचे वासर तेच यथार्थ ! (३६)

(जवानी की दुआ लडकों को नाहक लोग देते है
यही लडके मिटाते हैं जवानीको जवां होकर)
यौवनार्थ देती वृथा धन्यवाद युवकास
हेच युवक करिती मदे पुढती त्याचा नाश (३७)

(उभर के कहता है जोवन शवावमें उनसे
"हुजूर ! रख्खेंगे कवतक दवादवाके मुझे ?")

उठाव करुनी तिज पुसे यौवन येता रात
"कुठवर मज हे स्वामिनी ! ठेवशील दावात ?" (३८)

(सीना उभार पर है, जोवन उठान पर है,
लाखों तरह के सद्मे नन्ही से जानपर हैं)

ऊर उभारी आणि करि यौवन त्यात उठाव
जीव येवढासा परी त्यावर लाख दवाव ! (३९)

(खींचा मरहम को, तो कुछ और भी निकला जोवन
दव नहीं सकते दवानेसे उभरनेवाले)

चुरडताच यौवन करी अधिकाधिकच उठाव
बंडखोर उठती जरी केला किति अटकाव ! (४०)

नकार

(रोज कहते हो तुम कि आज नहीं
इस मरज का कोई इलाज नहीं)

रोज रोज म्हणतेस तूं की, 'छे ! नाही आज"
नाहीं या रोगावरी कांही अचुक इलाज (४१)

(आप कहते है वारवार 'नहीं,
हमको 'हां' का भी एतवार नहीं)

"नाही, नाही" कां वृथा म्हणसी वारंवार ?
नसे भरवसा आमुचा दिलास जरि होकार ! (४२)

धाकधमकी

(सब सहेंगे हम अगर लाख वुराई होगी
पर कहीं आंख लडाई तो लडाई होगी)

निंदा नालस्ती सहू, येउ न देऊ चीड
भिडली दृष्टिस दृष्टि पण तर नच ठेवू भीड ! (४३)

पडदपोशी

(दिलमें आजाओ कि है यह घर तो पर्दा कामका
हमने आंखें बंद करली, आओ, पर्दा हो गया)

या, ह्या हृदयी, का गृही पडदपोशिचे नाम ?
आम्ही डोळे झाकले ! झाले अवघे काम ! (४४)

दूत

(दोस्त के धोके में उसने दे दिया दुश्मन को खत
नामावर कैसा मेरा आखोंका अंधा हो गया ?)

मित्र समजुनी शत्रुला पत्र देइ सानंद
डोळस दूत असा कसा माझा बनला अंध ? (४५)

(२)

इराणी फुलांचा गुल्दस्ता

(पुढे कांही फारशी सूक्तींचा मराठी अनुवाद दिला आहे. मराठी वाचकांना फारशी भाषा समजणार नाही म्हणून मूळ फारशी सूक्ती दिल्या नाहीत)

थोरवी

लववावी तितुकी लवे पोलादी तलवार
'सदा विनययुत थोरवी' हेच यातले सार ॥१॥

ऐहिक सुख

इहसौख्ये तळहातिच्या असती कंडुसमान
खाजवितां वाटे बरे, पुढे नको हो प्राण ॥२॥

बापसे बेटा सवाई

'असे सवाई बापसे बेटा' हे हमखास
चंदनाहुनी चंदनी अत्तर दे बहुवास ॥३॥

नवल न, सन्मानी पिता गुणी आपुले मूल
रोप गुलाबाचे घरी शिरी गुलाबी फूल ! ॥४॥

आशा

निराशेत आशा वसे अजरामर सत्राण
कृष्ण घनाच्या भोवती खुले प्रभावळ छान ॥५॥

स्वार्थ

स्वार्थासाठी जो करी धर्म, कर्म, व्रत–दान
प्रभुवंचन करि वा करी कर्जवाम तो जाण ॥६॥

व्यंग

थोर व्यक्तिच्या अंगिचे व्यंग न पावे लोप
दुधात पडला केस तो दिसतो ताबडतोब ॥७॥

पूर्णत्व

असे नेहमी लीनता पूर्णत्वाची खूण
मुक्कामाला पोचता उतरे स्वार वरून ॥८॥

स्वावलंबन

परसाह्य न घ्यावे, स्वये साधावे निज काज
व्यजनि न, वारी मक्षिका, निजकर्णी गजराज ॥९॥

नागपूर
४–२–५९

––भवानीशंकर पंडित

तुझ्या चरणांची धूळ—

तुझ्या चरणांची धूळ
माझ्या माथ्याला लागली

अन् पापांची लाखोली
जळूनहि राख झाली

भक्तीचीच फुलवात
माझ्या अंतरी तेवली

पापण्यांच्या दारामध्ये
माझी वेदना हसली

—कुसुमानंद

सडा—

असा सडा घालतानां
झाला पदर तिरपा
लवलेली बट घाली
पापणीलाच बुरखा
बट सावरता झाला
स्पर्श भिजल्या चुड्यांचा
अंग अंग शहारले
फुटे चांदण्याची वाचा
सडा प्यालेल्या अंगणी
पहाटली रुपकळा
गोऱ्या तळव्यांना कशा
एकाएकी आल्या कळा !

—राजा महाजन

अनुक्रमणिका

परिचय-परामर्श

न्या. पुराणिक यांचे चरित्र

लेखक ज. रा. जोशी,

प्रकाशक अ. रा. गोखले, सुपरिंटेंडेंड, सेवासदन शाखा,
उत्तर अंबाझरी रोड, नागपूर. पृष्ठे ४२२, मूल्य ७ रु.

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि सार्वजनिक जीवनात रणझुंजार ठरलेल्या दोन मातब्बर व्यक्तींची चरित्रे लिहून श्री. जगन्नाथराव जोशी चरित्र वाङमयाच्या क्षेत्रात पुढे सरसावले त्यालाहि आज जवळ जवळ वीस वर्षे होत आली. डॉ. खरे आणि डॉ. केदार या सारख्या वड्या समकालीनांची विस्तृत चरित्रे आणि तीहि सर्वमान्य होतील असे लिहिणे हे काम सोपे नव्हे. पण हे काम यशस्वी रीतीने संपादून चरित्र लेखनाच्या क्षेत्रात श्री. जोशी यांनी आपले नांव चांगलेच फडकत ठेवले आहे आणि नागपूर विश्वविद्यालयाने त्यांच्या केदार चरित्राच्या केलेल्या गौरवाने त्या मानमान्यतेत विशेष भर पडली आहे.

चरित्रलेखनाच्या क्षेत्रात तरबेज झालेल्या श्री. जोशी यांच्या सारख्या लेखकाने प्रस्तुतच्या चरित्रग्रंथासाठी जी व्यक्ति निवडली आहे ती मात्र पहिल्या दोन्ही व्यक्तीहून अगदी वेगळी ! चरित्र नायकाच्या शोधात असलेल्या या लेखकाची नजर प्रस्तुत व्यक्तीकडे वळावी हे औचित्यपूर्ण असले तरी तितकेच अवघडपणाचे· कारण श्री. जोशी यांच्या पूर्वीच्या दोन्ही चरित्राचे नायक रणझुंजार व राजकारणी होते. डॉ. खरे यांचा चिवट आणि बेदरकार स्वभाव आणि कै. केदार यांचा अभिजात आणि प्रांजळ बंडखोरपणा साऱ्याच चरित्रनायकात आढळेल हे शक्य नाही आणि माणसाच्या रक्ताची चटक लागलेल्या वाघाप्रमाणे रणझुंजार व्यक्तींची रोमहर्षक चरित्रे वाचण्यास चटावलेल्या सामान्य वाचकाला वैचित्र्यहीन आणि साधे जीवन आकर्षून घेऊ शकत नाही हाहि नित्याचा अनुभव आहे.

नंदादीपाचा शांत प्रकाश

पण या अवघड प्रसंगातून श्री. जोशी यांनी मोठ्या चातुर्याने मार्ग काढला आहे. चरित्र नायकाला अवास्तव मोठेपण देण्याच्या मोहात न पडता त्यांच्या

अनुक्रमणिका

अबोल आणि विनीत, सौम्य आणि प्रसन्न अशा स्वभावातील मंदमधुर स्वभाव-रेखांचे प्रत्ययपूर्ण दर्शन घडविण्याची एक नवी पद्धति त्यांनी हाताळली आहे. न्यायमूर्तींच्या या चरित्रात विद्युद्दीपाचा लखलखाट नाही. वाऱ्याचे प्रलयगर्जित नाही, जलधारांचे अकांड—तांडव नाही. जे कांही आहे ते सौम्य आहे, प्रसन्न आहे आणि शांत आहे.

या शांत नंदादीपाच्या प्रकाशातहि जुन्या पिढीच्या नागपूरस्थ व्यक्तीला पदोपदी ओळखीचे चेहरे पाहावयास मिळतील, परिचित स्थळांचे दर्शन होईल आणि एक प्रकारे 'पुनःप्रत्ययाचे समाधान लाभेल. याच्या उलट जुन्या पिढीचे प्रतिक्षणी हरपणाऱ्या वैभवाचे आणि कर्तृत्वाचे दर्शन नव्या पिढीला नाविन्यपूर्ण वाटण्याचा संभव आहे. पुढेमागे नागपूर—विदर्भाचा सामाजिक इतिहास लिहू इच्छिणाऱ्या व्यक्तीला हा ग्रंथ साधनसाहित्य म्हणून मोलाचा वाटेल तर सामाजिक शास्त्राचा शोध घेऊ पाहणाऱ्या संशोधकाच्या दृष्टीने या ग्रंथातील पुराणिक घराण्याची कुळकथा आणि कुळाचार यांचे वर्णन महत्वाचे ठरेल. कष्टाळु विद्यार्थ्याला या चरित्रातील विद्यार्जनाची अवस्था सांगणारे प्रसंग गुंगवून सोडतील तर सार्वजनिक सेवा करणाऱ्या 'सामाजिका'ला महत्वाचे मार्गदर्शनहि मिळू शकेल न्या. पुराणिकांच्या आयुष्यात राजकारणाची वादळे नसतील, स्वभावात झुंजार-पणा नसेल आणि प्रतिपक्ष्याशी सामना घेऊन त्याची मस्ती जिरविणारे रंगेल प्रसंगहि नसतील—आणि तरीहि सामान्य वाचकांना आपापल्या परीने हे चरित्र वेधून घेतल्याशिवाय राहणार नाही.

'विरोधविकासा'चे मजेदार दर्शन

न्यायमूर्तींच्या आयुष्याच्या टप्पा-टप्प्यावर त्यांना भेटलेल्या व्यक्तींचे जे अबोल पण सूचक चित्रण या चरित्रात पाहावयास मिळते तेहि चरित्राचा चटक-दारपणा वाढविणारे आहे. लहानपणी धाकटया भावाला मार बसल्याचे ऐकून शाळेत मास्तराकडे तक्रार नेणारे—त्याच्या विद्यार्जनासाठी नोकरी पत्करणारे आणि त्याचा प्रत्येक हट्ट पुरविणारे ज्येष्ठ बंधु, 'जिवाची मुंबई' करताना दागि-न्याचा हट्ट धरून बसलेली पण पतिराजांनी योग्य समजूत करताच हट्ट मागे घेणारी सुशील पत्नी, साखरपुडा झाल्यानंतर जाण्यायेण्याच्या खर्चाची गोष्ट व्याह्याकडून निघताच 'आमचेकडे अशी चाल नाही' म्हणून ठणकावून सांगणारे पण लग्न होताच 'मुलीला घेऊन एकटे माथेरानला जाऊन या' म्हणून नवरदेवाला एकीकडे सुचविणारे व्याही, वकिलाने कोर्टांत येण्याचा त्रास चुकविल्याबद्दल आनंदाने तबेल्यातील घोडी नजर म्हणून पाठविणारे रईस राजेबहाद्दर, बंगल्या-साठी आवश्यक असलेली दहाहजाराची रक्कम तावडतोब देऊन गरज भागविणारे

पक्षकार, एखाद्या मातवर श्रीमंताप्रमाणे झोकात राहणारा आणि वकिलाच्या नांवावर पक्षकाराला लुवाडून चैन करणारा कारकून, 'नांवलौकिक कमवायचा असेल तर नागपूरलाच वकिली कर' म्हणून सल्ला देणारे ज्येष्ठ हितचिंतक यांची ही रेखाचित्रे थोडी असली तरी कमी महत्वाची नाहीत. एका सुखवस्तु वकिलाच्या घराचे चित्रण करायला या व्यक्ति प्रथमदर्शनी नुसत्या पडद्यावर आल्या तरी पुरे आहेत. शिवाय न्यायमूर्तीच्या आयुष्यातील 'विरोधविकास' दाखवायलाहि ही शब्दचित्रे वरीच सहाय्यक ठरावी.

प्रसन्न व सोज्वळ कुटुंब कथा

न्यायमूर्तीच्या स्वभावातील कौटुंबिक वात्सल्याच्या आणि प्रेमळपणाच्या ज्या छटा चरित्रलेखकांनी वर्णिल्या आहेत त्यामुळे या चरित्राला एका प्रसन्न आणि सोज्वळ, अशा कुटुंबकथेचे स्वरूप आले आहे. वालपणी विद्यार्जनासाठी कष्ट करणारे आणि 'निदान मला वी. ए. होऊ द्या' म्हणून वडिल बंधूंना गळ घालणारे वासुदेवराव येथे दिसतात तसेच नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुत्वाचा मुकुट डोक्यावर चढताच आपल्या वडिल भावाच्या चरणाशी विनम्र होणारे व आपल्या उज्वल यशाचे श्रेय त्यांना देणारे वासुदेवरावहि दिसतात. वाळपणी पित्याजवळ यात्रेला बरोबर नेण्यासाठी हट्ट करणारे वासुदेवराव अमेरिकेला जाताना आपल्या खोडकर मुलाला चुकवून जाताना आढळतात. न्यायमूर्तीच्या आसनावरून खाली येताच 'पुढे काय' या प्रश्नाने क्षणभर बावरलेले काकासाहेब आपले डोळे गमावून बसलेल्या एका परिचित मुसलमानाला नेत्र चिकित्सेसाठी दीडशे रुपये देतांना पाहिले म्हणजे आजच्या जगांत 'हरवलेला' म्हणून वाटलेला 'देवमाणूस' 'गवसला' असे क्षणभर वाटल्याखेरीज राहत नाही.

विशेषतः आपले एकावेळचे तरुण सहकारी श्री. कौशलेन्द्रराव यांच्या आजारपणाच्या काळात काकासाहेबांनी आपल्या प्रेमळ व्यक्तित्वाचे जे दर्शन करून दिले ते हृदयगंम व स्मरणीय ठरावे. कौशलेन्द्रांची तव्येत खालावली असताहि आणि मेडिकल कॉलेजमध्ये भरती करावी अशी मित्रांची इच्छा असताहि त्यांना खोली मिळू शकली नाही. ही अडचण काकासाहेबांना कळली तेव्हा काकासाहेब स्वतः मेडिकल कॉलेजमध्ये होते. कौशलेन्द्रांची प्रकृती कळताच काकासाहेबांनी स्वतःची खोली तत्परतेने कशी खाली करून दिली यांचे चरित्र-लेखकानी केलेले वर्णन मुळातच वाचावे. काकासाहेबांच्या मनाचा दिलदारपणा ज्यांनी अनुभवला आहे त्यांना या प्रसंगाच्या वाचनाने उत्कट पुनः प्रत्ययाचे समाधान होईल आणि ज्यांनी अनुभवला नसेल त्यांना त्यांच्या दिलदार आणि सौजन्यशील स्वभावाची क्षणात ओळख पटेल.

अनुक्रमणिका

सार्वजनिक संस्थांचे प्रकार !

आपल्या वृत्तीतील या सौजन्याच्या अंतःप्रवाहाला वाट करून देण्यासाठीच काकासाहेबांनी सार्वजनिक जीवनात पदार्पण केले असावे आणि त्यांच्या या वृत्ती-मुळेच नागपुरातील साऱ्याच संस्थाचे एक सल्लागार आणि स्नेही ही पदवी त्यांनी मिळविली. राजाराम वाचनालय, भिडे कन्याशाळा, वृद्ध सोसायटी, क्रीडा मंडळ, नागपूर स्कूल ऑफ आर्ट, किंग एडवर्ड मेमोरियल सोसायटी, गोरक्षण, सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक अशा भिन्न कार्य करणाऱ्या संस्थामध्ये कधी सेक्रेटरी तर कधी अध्यक्ष, कधी उपाध्यक्ष तर कधी सल्लागार अशा विविध तऱ्हेच्या जागा त्यांनी भूषित केलेल्या आहेत. किंबहुना चरित्रकाराच्या शब्दात सांगायचे तर—

> " गेल्या पाच दशकाच्या कालावधीत नागपूर शहरात ज्या ज्या नवीन संस्था निघाल्या आणि चालल्या, तसेच ज्या ज्या सामाजिक चळवळीचे प्रवर्तन झाले त्यात काकासाहेबांचा वाटा फार मोठा आहे. मोजक्या शब्दात सांगावयाचे झाले तर, काकासाहेब हे विदर्भ विभागातील, विशेषतः नागपूर शहरातील गेल्या अर्धशतकातील सार्वजनिक जीवनाचा मूर्तिमंत असा चालता बोलता इतिहास आहे. " (पृष्ठ ३०४)

चरित्रलेखकाने श्री. काकासाहेबांच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे मोजक्या शब्दात केलेले हे मूल्यमापन योग्य नाही असे कोण म्हणेल ?

सार्वजनिक जीवनातील आदर्श 'संवाद'

सार्वजनिक सेवेचे कंकण बांधल्यानंतर ते कार्य कसं करावं याची नमुनेदार उदाहरणे काकासाहेबांच्या चरित्रात बरीच आढळतात. ज्या ज्या संस्थेत त्यांनी महत्वाचे पद विभूषित केले त्या संस्थेची निरलसपणे आणि परिश्रमपूर्वक सेवा बजाविण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. कोणत्याहि सभेला ते कधी गैरहजर राहिले नाहीत असा त्या त्या संस्थांनी त्यांच्याबद्दल कौतुकाने केलेला निर्देश लक्षात ठेवण्यासारखा आहे. आणि एका संस्थेत काम करीत असताना दुसऱ्या संस्थेचे वाईट चिंतिण्याचा वा करण्याचा दुराग्रह त्यांच्या मनाला शिवला नाही. सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष असतांना 'महाराष्ट्र ब्राह्मण प्रॉव्हिडंट फंड' मंडळाच्या इमारतीबाबत कांही बांधा निघाला. मंडळाच्या सेक्रेटरींनी तो त्यांच्या कानावर घालताच त्यांनी स्वतः 'मोक्या'च्या जागी जाऊन संस्थेची अडचण पाहिली आणि महाराष्ट्र ब्राह्मण प्रॉ. फंडाच्या मंडळाला होणारा अन्याय ताबडतोब दूर केला. (पृ. १९६) राजाराम वाचनालय आणि भिडे कन्याशाळा या संस्थांच्या सीमे-बाबत वाद झाला तेव्हा काकासाहेब स्वतःच दोन्ही संस्थाचे अध्यक्ष होते आणि

म्हणून दोन्ही संस्थानी त्यांनाच लवाद नेमून त्यांचा निर्णय विनतक्रार मान्य केला. हा प्रसंगहि काकासाहेवांच्या न्यायवुद्धीवरील कार्यकर्त्यांचा विश्वास दाखविणारा आहे. विदर्भ साहित्य संघाच्या 'गडकरी समिती' वद्दल असेच वादंग निर्माण झाले तेव्हा उभय पक्षांनी काकासाहेवांनाच 'लवाद' होण्यास विनंती केली. काकासाहेवांनी त्यावेळी दिलेला निर्णय विदर्भ साहित्य संघाची अखंडता टिकविण्यास किती कारणीभूत झाला हे अनुभवी कार्यकर्ते जाणतातच.

एक भव्य व उदात्त स्वप्न

श्री. काकासाहेव एक कुशल वकील आणि पुढे न्यायमूर्ति म्हणून व्यावहारिक जीवनात सुप्रतिष्ठित झाले, नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुत्वाचा आणि पुढे पब्लिक कमिशनच्या सदस्यत्वाचा मान त्यांना मिळाला. शारीरिक शिक्षण-समितीच्या महामंडळाचे अध्यक्ष म्हणून वरीच वर्षे ते कार्य करीत होते आणि डिस्ट्रिक्ट कौन्सिलच्या उपाध्यक्षत्वापासून तो सेंट्रल को-ऑपरेटिव्ह वँकेच्या अध्यक्षत्वापर्यंत निरनिराळ्या महत्वाच्या निवडणुका त्यांनी जिंकल्या. पण या व्यावहारिक आणि क्रियाशील जीवनातहि त्यांचा स्वप्नाळूपणा त्यांना सोडून गेला नाही. क्रियाशील आणि व्यवहारी माणसाची स्वप्ने ही सामान्याच्या स्वप्नांपेक्षा भव्य आणि अद्‌भुत असतात आणि ती व्यवहारात उतरू शकली नाहीत तरी तेवढ्यावरून त्या स्वप्नांचे रंगहि विटत नसतात. किंवहुना कोण-त्याहि मोठ्या माणसाची स्वप्नें त्याच्या मनाइतकीच मोठी असतात, भव्य आणि उदात्त असतात. श्री. काकासाहेव तरूणपणी विलायतच्या सफरीस गेले असता त्यांनी तेथील शैक्षणिक स्थळे पाहिली आणि तेव्हापासून एक रम्य स्वप्न त्यांच्या नजरेपुढे खेळत होते आणि ते म्हणजे नागपूर विद्यापीठाची एक स्वतंत्र 'विद्यापीठ नगरी' वसवावी हे होय. (पृ. ९०) मनुष्याची कर्तवगारी त्याच्या आंगच्या कर्तृत्वात असेल पण त्याची उदात्तता त्याने मनाशी रचलेल्या स्वप्नात असते असे म्हणतात. न्या. पुराणिकांच्या स्वप्नाची ही उदात्तता आणि उत्तुंगता लक्षणीय नाही असे कोण म्हणू शकेल ?

कलात्मतेच्या अभावाची खंत कशाला ?

समकालीनाचे चरित्र–चित्रण आणि त्याच्या कर्तृत्वाचे योग्य मूल्यमापन या दोन्ही गोष्टी चरित्र लेखनाच्या क्षेत्रातील अवघड गोष्टी होत. या अवघड गोष्टी साधण्याचा श्री. जोशी यांनी केलेला प्रयत्न निश्चितच कौतुकार्ह ठरेल. या चरित्रासाठी काकासाहेवांची पत्रे, मित्राच्या आठवणी, घराण्याच्या दंतकथा, भाषणांची इतिवृत्ते यासारखा मालमसाला वापरण्यात त्यांच्या 'कला'–कौशल्याचा प्रत्यय झाल्याशिवाय राहत नाही. खुद्द श्री. जोशी यांना मात्र आपल्या चरित्र

लेखनात पुरेशी कलात्मकता नसल्याबद्दल खंत वाटत असावी असे त्यांच्या प्रस्तावनेतील कांही उद्‌गारावरून वाटते. परंतु खरे पाहता कलात्मता अशी अनिवार्य चीज नव्हे की जिच्यासाठी विशेष खंत त्यांनी प्रकट करावी. चरित्रलेखनाचा खरा आत्मा 'जिव्हाळा' आहे आणि त्या जिव्हाळ्याशी समरस होऊ शकेल इतपत मर्यादेने कलात्मकता चरित्र-लेखनात आली तरच ती शोभून दिसते. तेव्हा चरित्र लेखनात कलात्मता नसली तरी ती विशेष खंत बाळगण्याजोगी गोष्ट नव्हे एवढेच आम्ही मित्रत्वाच्या नात्याने श्री. जोशी यांना सांगू इच्छितो.

चरित्रग्रंथाचे महत्व

चरित्र प्रकाशनाच्या वेळी हयात असलेले श्री. काकासाहेब आज दुर्दैवाने काळाने आमच्यातून हिरावून नेले आहेत. अशा स्थितीत तर या चरित्रग्रंथाचे महत्व विशेषच वाटते. काकासाहेबांच्या सार्वजनिक सेवेचा बराचसा वाटा नागपूरच्या 'सेवासदन' या शिक्षणसंस्थेला मिळाला आणि त्या उपकृतीचं स्मरण जागृत ठेवून त्या संस्थेने या चरित्र प्रकाशनाचा भार आपल्या शिरावर घेतला ही गोष्ट त्या संस्थेच्या सौजन्याला भूषणावहच ठरेल. विशेषत: कै. काकासाहेबांच्या हयातीतच हे चरित्र प्रकाशित करून त्यांच्या कर्तृत्वाला अभिवादन करण्याची जी संधि लेखक आणि प्रकाशक यानी मिळविली तीबद्दल त्यांचे आम्ही अभिनंदन करतो आणि श्री. जोशी यांच्या चरित्रलेखनाला यापुढे याहूनहि मोलाचा आणि आगळा बहर येईल अशी आशा करतो.

--भा. श्री. परांजपे

नाना जोगांचे 'भारती'-(पृ. २० वरून)

होत आहे. नवनाटचाच्या विकासाच्या या संदर्भात नाना जोगांच्या 'भारती' या नाटकाची मात्र कोणीहि फारशी दखल घेताना दिसत नाही. तिच्याकडे दुर्लक्षच केले जात आहे. विशेषत: मनोविश्लेषण, संज्ञाप्रवाह इत्यादींच्या नांवाखाली उथळ व अकलात्मक लेखनाचाहि आज जो बोलबाला होत आहे त्या पार्श्वभूमीवर नाना जोगांची ही उपेक्षा अधिक खेदजनक वाटते. जोगांचा मनोविश्लेपणाचा व्यासंग दांडगा होता. त्यांची 'भारती' ही एक श्रेष्ठ मनोविश्लेषणात्मक कृति आहे. नवनाटचामध्येच नव्हे तर मनोविश्लेषणात्मक स्वरुपाच्या संपूर्ण नव-कथा साहित्यामध्ये तिला अतिशय महत्त्वाचे व मानाचे स्थान मिळायला हवे यादृष्टीने या कलाकृतीच्या अंतरंगाची ओळख करून देवून तिचे महत्त्व रसिक वाचकांच्या निदर्शनास आणणे हेच या लेखाचे प्रयोजन आहे.

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

भेटी व सत्कार

(१) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित डॉ. वि. वा. करंबेळकर यांना नागपूर विद्यापीठाने डी. लिट्. पदवी देऊन गौरविल्याबद्दल विदर्भ साहित्य संघाचे वतीने दि. १३-५-६२ रोजी त्यांचा सत्कार, संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आला. यावेळी म. म. डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. श्री. भा. वर्णेकर आणि प्रा. मा. गो. वैद्य यांची भाषणे झाली.

(२) विदर्भाचे एक कृषितज्ज्ञ डॉ. ना. मा. निमगडे हे अमेरिकेतील विस्कान्सीन विश्वविद्यालय, मॅडिसन, विस्कान्सीनमधून कृषि–विषयाची पी. एच्. डी. ही श्रेष्ठ पदवी प्राप्त करून मायदेशी परत आले. त्यांनी रविवार दि. २४–६–६२ रोजी वि सा. संघाला भेट दिली. यावेळी संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली डॉ. निमगडे यांनी "अमेरिकेतील सांस्कृतिक जीवन" या विषयावर व्याख्यान दिले.

(३) महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांनी रविवार दि. २२–७–६२ रोजी सायं. ७–३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस श्री. श्री. गो. काशीकर आणि चिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी श्री. पाटील यांना संघ मंदिर आणि रंगमंदिर दाखविले. नंतर पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केल्यावर त्यांना वि. सा. संघाच्या कार्याची माहिती दिली. यावेळी श्री. पाटील यांनी संघकार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

कै. अ. ब. कोल्हटकर पुण्यतिथि

वि. सा. संघातर्फे दि. १५ जून ६२ रोजी सायं. ६–३० वा. 'देशसेवक', 'संदेश' आणि 'स्वातंत्र्य' या दैनिकांचे संपादक कै. अ. ब. कोल्हटकर यांचा ३१ वा स्मृतिदिन डॉ. भवानीशंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

या समारंभासाठी कै. अच्युतराव कोल्हटकर यांचे परमस्नेही व मुंबईचे ज्येष्ठ कार्यकर्ते रामतानंद श्री. अ. ह. गद्रे हे मुद्दाम नागपुरास आले होते. यावेळी श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. पु. य. देशपांडे श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ग. त्र्यं माडखोलकर आदि वक्त्यांची भाषणे झाली.

महाकवि कालिदास स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे महाकवि कालिदास स्मृतिदिन सोमवार दिनांक २–७–६२ रोजी ६–३० वा. साजरा झाला. यावेळी प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे "कवि कालिदासाचा रघुवंश" या विषयावर सुश्राव्य भाषण झाले.

व्यास पौर्णिमा

व्यास पौर्णिमेनिमित्त दि. १८–७–६२ रोजी सायं. ७ वाजता गडकरी-सभागृहात प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली म. म. साहित्यचार्य बाळशास्त्री हरदास यांचे "भारतीय परंपरेत गुरूचे स्थान" या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

मुंबई येथे विदर्भ साहित्य संघ मंडळ आणि "विदर्भ साहित्य भवन" होणार.

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरात–विदर्भ साहित्य संघ-मंडळ स्थापून विदर्भ साहित्य भवन बांधले जावे असा महत्वपूर्ण निर्णय, वि. सा. संघाच्या मुंबई येथील सभासदांच्या सभेत, मंगळवार दि. २४–७–६२ रोजी, महाराष्ट्राचे बांधकाम व यातायात मंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांचे निवास-स्थानी त्यांचेच अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या प्रसंगी माननीय श्री. कन्नमवारजी यांनी प्रस्ताविक भाषण करून विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यात सौहार्द निर्माण होण्यासाठी प्रस्तुत उपक्रमाचे महत्व विशद केले. ह्यावेळी 'तरुणभारता'चे संपादक व वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारी सदस्य सौ. सुमतीबाई धनवटे यांनीहि अशा प्रकारचे मंडळ स्थापण्याचे औचित्य विशद करणारी भाषणे केली. प्रस्तुत उपक्रमाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचा आशीर्वाद लाभला, हा अत्यंत उत्सावर्धक विशेष होय. प्रस्तुत मंडळासाठी जागा मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. तोवर ह्या मंडळाला मुंबई मराठी साहित्य संघाच्या इमारतीत जागा देण्यात येईल, असे मुंबई मराठी साहित्य संघाचे कार्यवाह व वि. सा. संघाचे आजीव सदस्य श्री. बापुराव नाईक यांनी सांगितले. प्रस्तुत मंडळातर्फे

वैदर्भीय साहित्य मुंबई येथे उपलब्ध करून देणे, वैदर्भीय साहित्यिकांच्यासाठी निवासस्थान बांधणे आणि विदर्भ व महाराष्ट्रातील इतर भाग यांच्यात भावनात्मक ऐक्य निर्माण करणे, हे प्रयत्न व्हावेत, अशा आशयाचे ठराव प्रस्तुत सभेत स्वीकृत करण्यात आले.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिति, नागपूर

परीक्षा समय-शनिवार दि. २५ ऑगस्ट १९६२ पासून विभिन्न केंद्रात परीक्षा सुरू होतील

परीक्षार्थ्यांना सूचना–परीक्षेपूर्वी २ दिवसांचे आत केंद्राधिकाऱ्यांकडून प्रवेश-पत्रे मिळवून स्थान व समयाची माहिती प्राप्त करून घ्यावी. यावावत कार्यालयाकडे चौकशी करू नये.

केंद्राधिकाऱ्यांना सूचना–(१) आलेले साहित्य बरोबर आहे किंवा नाही हे तपासून पहावे व कमी–अधिकाची सूचना कार्यालयाला त्वरित द्यावी. (२) परीक्षा संपताच पहिल्या डाकेने सर्व साहित्य व हिशेब कार्यालयाकडे रवाना करावेत (३) परीक्षार्थ्यांना परीक्षेस बसविण्यास सहकार्य देणाऱ्या प्रचारकांना परीक्षेचेवेळी निरीक्षक म्हणून नियुक्त करावे: तसेच मराठी प्रवेश परीक्षेच्या मौखिक परीक्षेकरिता केंद्राधिकाऱ्यांनी आपल्यावतीने परीक्षकाची नियुक्ति करावी.

परीक्षेचे वेळपत्रक

शनिवार दि: २५ ऑगस्ट १९६२	**वेळ सकाळी ७–३० वाजता**
परीक्षा	**प्रश्नपत्र**
साहित्य पारंगत	१
शनिवार दि. २५ ऑगस्ट १९६२	वेळ दुपारी २–३० वाजता
साहित्य पारंगत	**प्रश्नपत्र** २
साहित्य स्नातक	१
रविवार दि. २६ ऑगस्ट १९६२	वेळ सकाळी ७–३० वाजता
साहित्य पारंगत	**प्रश्नपत्र** ३
साहित्य स्नातक	२
साहित्य परिचित	१

रविवार दि. २६ ऑगस्ट १९६२ — वेळ सकाळी ७–३० वाजता

साहित्य विनीत	प्रश्नपत्र १
मराठी प्रारंभ	
मराठी प्रवेश (लेखी)	
(मौखिक ९–३० वा.)	

रविवार दि. २६ ऑगस्ट १९६२ — वेळ दुपारी २–३० वाजता

साहित्य पारंगत	प्रश्नपत्र ४
साहित्य स्नातक	
साहित्य परिचित	२
साहित्य विनीत	२

दिनांक १० ऑगस्ट १९६२
विदर्भ साहित्य संघ
नागपूर

(प्रा.) माणिक के. वंजुले
[illegible]
[illegible]

○ ○ ○

"विदर्भ विषयः सारस्वती जन्मभूः"

विदर्भ साहित्य संघ

–इ. स. १९६१–६२ चे वार्षिक कार्यवृत्त–

१. प्रास्ताविक–

घटनेप्रमाणे विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल ६१ पासून सुरु झाले. या वर्षामध्ये कार्यकारी मंडळाच्या सहा सभा आणि दोन साधारण सभा झाल्या.

२. सभासद–

चालू वर्षी विदर्भ साहित्य संघाचे एकूण १२९० सभासद होते. त्यात एकूण २२३ आजीव सभासद असून त्यांपैकी ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक आणि ५ हितचिंतक आहेत.

३. समित्यांचे कार्य–

विदर्भ साहित्य संघाचे कार्य प्रामुख्याने भिन्नभिन्न समित्यांच्या द्वारे चालते. चालू वर्षी निरनिराळया समित्यांनी पुढीलप्रमाणे अतिशय उत्साहपूर्वक कार्य केले आहे.

(३) सांस्कृतिक कार्यक्रम समिति–

(आमंत्रक–श्री. य. गो. मालोदे)

गणेशव्याख्यानमाला–

दि. २५ ते २८ एप्रिलपर्यंत ह. भ. प. प्रा. शं. वा. ऊर्फ सोनोपंत दांडेकर यांची "साक्षात्कार शास्त्र" या विषयावर भाषणे झाली.

शिवजयंति–

दि. १७ एप्रिल रोजी कवि श्री. श्री. शां. गुप्ते विरचित "शिवगीत" गायनाचा कार्यक्रम श्री. प्रभाकर गडकरी आणि चमू यांनी सादर केला.

अनुक्रमणिका

व्याख्याने–

लो. टिळक संस्कृत विद्यापीठाचे प्राचार्य न्या. चू. श्री. दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर यांचे दि. २८–६–६१ रोजी "भारतीय सुराज्य" या विषयावर व्याख्यान झाले.

कालिदास स्मृतिदिन–

आषाढ शुद्ध प्रतिपदा दि. १३ जुलै रोजी महाकवि कालिदास स्मृतिदिनानिमित्त प्रा डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे "कुमारसंभव" या काव्यावर भाषण झाले.

व्यासपौर्णिमा–

दि. २८ जुलै रोजी व्यासपौर्णिमेनिमित्त प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचे "व्यासांचे साहित्यिक कार्य" या विषयावर भाषण झाले.

लो. टिळक जयंति–

आषाढ वद्य षष्ठि दि. २ ऑगस्ट रोजी माननीय श्री. स. वि. पागे (अध्यक्ष, विधान परिषद् म. रा.) यांचे "गीतारहस्यातील कर्मयोग" या विषयावर भाषण झाले. यावेळी प्रा. ल. रा. कुळकर्णी यांनी कै. म. म. केशव गोपाळ ताम्हण यांची लोकमान्यांवर रचलेली कविता वाचून दाखविली. तसेच श्री. ग. गो. कात्यायन यांनी स्वरचित काव्य म्हणून दाखविले.

कवि "बी" पुण्यतिथि–

दि. ३० ऑगस्ट रोजी कवि "बी" पुण्यतिथिनिमित्त प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे यांचे भाषण झाले.

शारदोत्सव–

दि. १५ ते २२ ऑक्टोबरपर्यंत श्रीशारदोत्सव साजरा झाला. यावेळी पुढील वक्त्यांनी पुढील विषयावर व्याख्याने दिली.

दि. १५ रोजी श्री. अप्रबुद्ध पाळेकर यांच्या हस्ते श्रीशारदोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. व. स. येरकुंटवार यांचे "आजची शारदोपासना" या विषयावर भाषण झाले.

दि. १६–वक्ते–श्री. व. शा. वरखेडकर विषय–"महाभारतातील तर्कशास्त्र"

दि. १७–वक्ते–म. म. साहित्याचार्य वाळशास्त्री हरदास विषय–"वध स्तंभाच्या छायेतील कविता."

अनुक्रमणिका

दि. २० वक्ते– प्रा. श्री. शं. खानविलकर, विषय– "साहित्याचे ध्येय आणि स्वरूप".

दि. २१, वक्ते– प्रा. श्री. मा. कुलकर्णी, विषय– "साहित्याचे आवाहन".

दि. २२, वक्ते– प्रा. भ. श्री. पंडित, विषय– "साहित्य: व्यक्ति आणि-परिस्थिति".

रवीन्द्रनाथ टागोर शताब्दि–

(१) नृत्यसम्राट् उदयशंकर यांचे नृत्याचा कार्यक्रम–

टागोर शताब्दि महोत्सवानिमित्त दि. ६, ७ व ८ नोव्हेंबर रोजी नृत्य-सम्राट श्री. उदयशंकर, सौ. अमलाशंकर आणि चमू यांनी वि. सा. संघाच्या रंगमंदिरात गुरुदेव टागोरांच्या "सामान्यक्षति" या काव्यावर आधारित नृत्य-नाट्य सादर केले.

(२) कविसंमेलन–

दि. २५ नोव्हेंबर रोजी टागोर शताब्दि–महोत्सवानिमित्त कवि संमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्षस्थान प्रा. श्री. भा. वर्णेकर यांनी मंडित केले होते. या कविसंमेलनात प्रा. या. मु. पाठक, प्रा. एम्. आर्. खान, प्रा. मधुकर वावगावकर, सौ. उपाताई लिमये, सौ. प्रमिलाताई भागवत, श्री. ग. गो. कात्यायन, श्री. मृदुल मिश्र, प्रा. म. ना. सरपटवार, श्री. आझाद साहू, श्री. मा. गो. जामदार व प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे यांनी भाग घेतला. कविभूषण प्रा. व. ग. खापर्डे यांनी मुद्दाम पाठविलेली "नभोराजा" ही कविता प्रा. या. मु. पाठक यांनी वाचून दाखविली.

श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथि–

श्रीज्ञानेश्वरमहाराज पुण्यतिथिनिमित्त दि. ५ डिसेंबर रोजी प्रा. भ. प्र. मोहरीर यांचे श्रीज्ञानेश्वरांच्या काव्यस्वरूपाविषयी भाषण झाले.

कविवर्य श्री. ना. वा. टिळक जन्मशताब्दि

कविवर्य ना. वा. टिळक यांचा जन्मशताब्दि उत्सव दि. ६ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, श्री. आर्. ए. हिवाळे, प्रा. म. शं. वावगावकर आणि प्रा. भ. श्री. पंडित यांची कविवर्य टिळकांच्या काव्य आणि जीवनासंबंधी माहितीपूर्ण भाषणे झाली. शेवटी सर-चिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी समारोपाचे भाषण केल्यावर कार्यक्रम संपला.

कै. प्रा. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला–

कै. प्रा. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेच्या निमित्ताने, ख्यातनाम टीकाकार प्रा. श्री. के. क्षीरसागर यांची दि. १९, २० व २१ जानेवारी ६२ रोजी "आधुनिक साहित्याचे त्रिनेत्र–सौंदर्यवाद, गूढवाद व वास्तववाद" या विषयावर व्याख्याने झाली.

वि. सा. संघाचा वर्धापनदिन–

(१) दि. १४ जानेवारी रोजी वि. सा. संघाचा ३९ वा वर्धापनदिन मोठ्या थाटाने साजरा झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भवानीशंकर नियोगी यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी 'साहित्य गोष्ठींचा' कार्यक्रम झाला.

(२) "चित्रशाले"चे उद्घाटन–

संघाच्या वर्धापनदिनी नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'चित्रशाले'चे (Art Gallery) उद्घाटन पॉलिटेकनिक स्कूलचे प्राध्यापक श्री. वसंतराव देहाडराय यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी नागपुरातील चित्रकारांच्या कलाकृतीचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.

दुपारी सहभोजनाचा कार्यक्रम झाला.

(आ) नाटककार कै. राम गणेश गडकरी स्मारक समिति–

(आमंत्रक–श्री. र. वि. कुलकर्णी)

कवि, नाटककार कै. रा. ग. गडकरी यांचा ४३ वा स्मृतिदिन समारंभ दि. २२ जानेवारी ६२ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी मराठीचे प्राध्यापक श्री. म. शं. वावगावकर यांचे "कवि गोविंदाग्रज: एक अभ्यास" या विषयावर विचारपरिप्लुत भाषण झाले.

दि. २३ रोजी वि. सा. संघाच्या सावनेर शाखेतर्फे गडकरी स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या समारंभासाठी श्री. र. वि. कुलकर्णी (आमंत्रक) प्रा. म. शं. वावगावकर आदि मंडळी नागपुराहून गेली होती. यावेळी कै. गडकऱ्यांच्या दहनभूमीवरील समाधीला पुष्पमाला अर्पण करण्यात आल्यावर प्रा. म. शं. वावगावकर यांचे भाषण झाले.

(इ) युगवाणी" संपादक मंडळ–

(संपादक–प्रा. श्री. मा. कुलकर्णी)

"युगवाणी" संपादक मंडळाने प्रस्तुत "युगवाणी" मासिकाचे दहा अंक प्रसिद्ध केले विशेषत: दिवाळी आणि साहित्य–संमेलन विशेषांक प्रसिद्ध करून

अनुक्रमणिका

मासिकाचा साहित्य-विषयक दर्जा अधिक उंचावण्याचा प्रयत्न सफल करून दाखविला.

(इ) परीक्षा समिति–

(संचालक–प्रा. तु. वि. गेडाम)

अ–मराठी भाषिकांना मराठी भाषेची ओळख करूण देण्यापासून, साहित्य विषयात प्रावीण्य संपादन करता येईल, अशा योग्यतेच्या मराठी प्रवेश ते साहित्य पारंगत परीक्षेपर्यंत विविध परीक्षा वि. सा. संघातर्फे वर्षातून दोनदा घेण्यात येतात. प्रस्तुत वर्षी निरनिराळ्या परीक्षांना पुढीलप्रमाणे विद्यार्थी बसले.

सप्टेंबर सत्र : १९६१ केंद्र : २५			फेब्रुवारी सत्र: १९६२ केंद्र : २१–		
मराठी प्रवेश	—	४०	मराठी प्रवेश	—	८
मराठी प्रारंभ	—	२६३	मराठी प्रारंभ	—	१०५
साहित्य विनीत	—	४३७	साहित्य विनीत	—	१९७
साहित्य परिचित	—	७९	साहित्य परिचित	—	३६
साहित्य स्नातक	—	९	साहित्य स्नातक	—	१५
साहित्य पारंगत	—	०	साहित्य पारंगत	—	१
		८२३			३६२

(उ) ग्रंथालय समिति–

(आमंत्रक–श्री. गो. स. देहडराय)

ग्रंथालयाकरिता यावर्षी खालीलप्रमाणे पुस्तकरूपाने देणग्या मिळाल्या, त्यावद्दल वि. सा. संघ देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

नांव	ग्रंथ
श्री. अण्णासाहेब मुगटे, नागपूर	४९
डॉ. ना. भा. खरे, नागपूर	५०

श्री शिवाजी ग्रंथालय बांधकामासाठी देणग्या–

(१) श्रीमान् पु. वा. काळे यांची कन्या सौ. नलिनी वर्मा दिल्ली यांचेकडून २५०० रु.

(२) श्रीमान् पु. वा. काळे यांची कन्या सौ. शैलजा सर्वटे यांचेकडून २५०० रु.

अनुक्रमणिका

वि. सा. संघ या देणगीदारांचे ऋणी आहे.

१ ऑगस्ट पासून ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग, संदर्भ-ग्रंथ म्हणून उपयोग करता यावा म्हणून सर्व सभासदांना ग्रंथालय खुले करण्यात आले.

ग्रंथालयासाठी--तरुण भारत, (पुणे-नागपूर) महाराष्ट्र, युगधर्म, नवयुग, मराठवाडा, साधना, लोकराज्य, लोकमत, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, प्रतिष्ठान, म. सा. पत्रिका, एकता, सत्यकथा, साहित्य सहकार, रहस्यरंजन, नवभारत, चित्रमयजगत्, पुरुषार्थ, सुषमा, उद्यम, मुलांचे मासिक, अमृत, गोकुळ, भारतमित्र, सर्वोदय, संशोधन पत्रिका, श्रीयुत, प्रज्ञालोक, वीणा, प्रसाद, जीवनविकास आदि वर्तमानपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके सप्रेम भेट म्हणून येतात. वि. सा. संघ या सर्व नियतकालिकांच्या चालकांचा अत्यंत आभारी आहे.

(ए) नाट्यसमिति--

(आमंत्रक—श्री. बाबुराव चिमोटे)

दि. १ जून ६१ रोजी नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर पुण्यतिथि साजरी करण्यात आली.

दि. २-९-६१ रोजी नाट्याचार्य श्री. कृ. प्र. खाडिलकर पुण्यतिथि डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली. यावेळी प्रा. श्री. शं. खानविलकर यांचे भाषण झाले.

दि. २, ३ व ५ जानेवारी ६२ रोजी दिल्लीचे श्री. य. दा. केळकर यांची नाट्यशास्त्रावर उद्‌बोधक व्याख्याने झाली.

श्री. खोलकुटे ढाल-नाट्यस्पर्धा

वि. सा. संघाच्या विद्यमाने दरवर्षी विदर्भ विभागासाठी आंतर महाविद्यालयीन खोलकुटे ढाल-नाट्यस्पर्धा होत असते. यंदाच्या स्पर्धेत नागपुरच्या आयुर्विज्ञान महाविद्यालयाने ही ढाल जिंकली. या महाविद्यालयाने श्री. पु. ल. देशपांडे कृत "सुंदर मी होणार" हे नाटक सादर केले.

निरोप

सुप्रसिद्ध नाटककार श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांची दिल्लीला बदली झाल्याबद्दल नाट्य समितीतर्फे त्यांना निरोप देण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्री. ना. रा. शेंडे, श्री. य. गो. मालोदे यांची भाषणे झाली. नंतर अल्पोपहाराचा कार्यक्रम झाला.

(ऐ) सत्कार व भेटी

(१) महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक श्री. भा. कृ. केळकर यांनी दिनांक २७–६–६१ रोजी वि. सा. संघाला भेट दिली.

(२) मराठीतील सुप्रसिद्ध ग्रंथकार आणि योगविद्येचे व्यासंगी प्रा. श्री. शं. खानविलकर यांनी दि. ७–७–६१ रोजी भेट दिली.

(३) "महाराष्ट्रा"चे संपादक आणि वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर उर्फ बाळासाहेब ढवळे यांचा षष्टयब्दीपूर्तीसमारंभ दि. ५ ऑगस्ट रोजी न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. श्री. गो. काशीकर, म. म. साहित्याचार्य बाळाशास्त्री हरदास, श्री. ना. रा. शेंडे यांची भाषणे झाली.

(४) न्या. मू. श्री. ग. ब. वडकस (उपकुलगुरु, नागपूरविद्यापीठ) यांचा षष्टयब्दीपूर्तीनिमित्त दि. २१ ऑगस्ट रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, म. म. डॉ. वा. वि मिराशी, प्रा. श्री. गो. काशीकर आणि डॉ. ना. र. देशपांडे यांची गौरवपर भाषणें झाली.

(५) महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवि श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) यांच्या षष्टयब्दीपूर्तीनिमित्त दि. २१ सप्टेंबर रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध प्रा. श्री. गो. काशीकर, प्रा. भ. श्री. पंडित, सौ. विमलाबाई देशपांडे, श्री. श्री. वा. रानडे (मुंबई) यांची भाषणे झाली.

(६) महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक, टीकाकार आणि वि. सा संघाच्या पूर्वाध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे ह्यांची ४३ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी सौ. कुसुमावतीबाईंच्या साहित्यविषयक कामगिरीचा यथोचित गौरव करणारी प्रा. श्री. गो. काशीकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. भ. श्री. पंडित आणि डॉ. वि. भि. कोलते यांची भाषणे झाली.

(७) न्यूयॉर्क तेथील प्राध्यापक डॉ. सुबोधचंद्र रॉय यांचे दि. १७–८–६१ रोजी Functions of Comparative Philosophy : East & west " या विषयावर भाषण झाले.

(८) महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक आणि नाटककार श्री. पु. ल. देशपांडे यांनी दि. १० डिसेंबररोजी वि. सा. संघाला भेट दिली.

(९) दि. २९–१–६२ रोजी, डॉ. चिं. द्वा. देशमुख यांनी भेट दिली.

(१०) दि. ८–२–६२ रोजी कथालेखिका व नाटककार कु. डॉ. तारा वनारसे यांनी भेट दिली.

(११) डॉ. ना. भा. खरे यांचा ८१ वा वाढदिवस दि. १७–३–६२ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांना पुष्पमाला आणि श्रीफल अर्पण केले. याप्रसंगी श्री. ग. त्र्यं माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे आणि श्री. ज. रा. जोशी यांनी डॉक्टर साहेबांच्या आजपर्यंतच्या राजकीय आणि सार्वजनिक कार्याचा आढावा घेणारी भाषणे केली.

महाराष्ट्रातील सुविख्यात कथालेखकांची भेट आणि सत्कार :–

महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक आणि कथालेखक पं. महादेवशास्त्री जोशी, श्री. ग. दि. माडगूळकर, श्री. व्यंकटेश माडगूळकर, श्री. सोपानदेव चौधरी, श्री. शंकर पाटील, श्री. द. मा. मिरासदार यांनी दि. २०–३–६२ रोजी सकाळी ९ वाजता वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे, चिटणीस श्री. य. गो. मालोदे आणि श्री. गो. स. देहाडराय यांनी सर्वांना संघ-मंदिर आणि रंगमंदिर दाखविले. तदनंतर हिंदी मोर भवनात वि. सा. संघ आणि हिंदी साहित्य संमेलन या दोन संस्थांच्या वतीने कथाकारांचा सत्कार करण्यात आला.

(ओ) "चित्रशाला" समिति––

आमंत्रक–श्री. दि. के. मनोहर
सहआमंत्रक–श्री. मधुकर पारळकर

वि. सा. संघाच्या विद्यमाने एक नवीन उपक्रम यावर्षी करण्यात आला. तो म्हणजे "चित्रशाला" (Art gallery) हा होय. संघाच्या ३९ व्या वर्धापन-दिनी म्हणजे दि. १४ जानेवारी रोजी चित्रशाळेचे उद्घाटन प्रा. वसंतराव देहाडराय यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी "चित्रशाले"त नागपुरातील चित्रकारांच्या कलाकृति ठेवण्यात आल्या होत्या. नागपुरातील जनतेने या "चित्रशाले"च्या उपक्रमाचे कौतुक केले.

चित्रकला प्रदर्शन––

साकोलीचे श्री. धनंजय नाकाडे यांच्या चित्रकलेचे प्रदर्शन दि. ४, ५ व ६ फेब्रुवारी पर्यंत भविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन दि. ४ फेब्रुवारी रोजी प्रा. मिस् रोझाना ग्रोआर्क (जर्नॅलिझम डिपार्टमेंट, हिस्लॉप कॉलेज) यांचे हस्ते झाले. या प्रदर्शनात चित्रकाराने ४० चित्रे ठेवली होती.

अनुक्रमणिका

चित्रशाळा समितीच्या वतीने दि. १८–२–६२ रोजी प्रा. करंजकर (गव्ह. पॉलिटेकनिक् स्कूल) यांचे "कांग्रा चित्रकलाकृति" या विषयावर उद्बोधक भाषण झाले.

चित्रकार श्री. अ. सी. मोरघडे यांच्या चित्रकलेचे प्रदर्शन दि. ११, १२ आणि १३ मार्च ६२ पर्यंत चित्रशालेत भरविण्यात आले. दि. ११ रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. पु. य. देशपांडे यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

दि. १४–३–६२ रोजी मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. व्ही. एस्. गुर्जर यांचे, चित्राच्या प्रात्यक्षिकासह भाषण झाले. यावेळी श्री. गुर्जरांनी एका म्हाताऱ्या मजुराला समोर बसवून चित्र काढून दाखविले.

चित्रकारांचा सत्कार––

"चित्रशाला" समितीच्या वतीने दि. १८–३–६२ रोजी नागपुरातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चित्रकारांचा सत्कार, श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी श्री. खं. स. उर्फ दादासाहेब पारळकर, श्री. विनायकराव मसोजी, श्री. बापुसाहेब आठवले, श्री. देशमुख पेंटर, श्री. बिड पेंटर व श्री. गायकवाड पेंटर या कलावंतांचा पुष्पहार आणि श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. सुरुवातीला श्री. मधुकर पारळकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर श्री. आ. रा. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची प्रमुख भाषणे झाली. यावेळी श्री. मुकुंद पारळकर श्री. आठवले आणि प्रा. वसंतराव देहाडराय यांचीहि समयोचित भाषणे झाली.

(औ) न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन (विदर्भ विभाग) वादस्पर्धा:–

दरवर्षीप्रमाणे यंदा दि. १७–११–६१ रोजी सायं. ७ वाजता कै. न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा आयोजित करण्यात आली. या वादस्पर्धेत विदर्भ महाविद्यालय, अमरावती, नागपूर महाविद्यालय, हिस्लॉप कॉलेज, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, धनवटे राष्ट्रीय महाविद्यालय आणि मोहता विज्ञान महाविद्यालय या सहा महाविद्यालयांनी भाग घेतला.

वादस्पर्धेचा विषय––"सद्य:स्थितीत लोकशाही विकेंद्रीकरण इष्ट व हितकारक आहे."

या समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. ए. यु. शेख, विभागीय आयुक्त यांनी स्वीकारले होते आणि परीक्षक म्हणून प्रा. डॉ. ना. र. देशपांडे, श्री. ना. रा.

शेंडे आणि ॲड. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी काम केले. या स्पर्धेची रौप्य ढाल अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाने मिळविली. तसेच रु. १०० चे वैयक्तिक प्रथम पारितोषिक कु. उषा ठाकूर (विदर्भ महाविद्यालय) यांना आणि रु. ७५ चे दुसरे पारितोषिक श्री. सु. पां. कुलकर्णी (नागपूर महाविद्यालय) यांना मिळाले. बक्षिस समारंभ डॉ. ए. यु. शेख यांच्या हस्ते झाला. शेकडा ५० टक्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या खालील वक्त्यांना प्रमाणपत्रे मिळाल्याचे जाहीर करण्यात आले. (१) श्री. सु. पां. कुलकर्णी (२) कु. रूपा कुलकर्णी (३) कु. माणिक गोखले (४) कु. उषा ठाकूर (५) कु. विजया मोडक (६) श्री. वो. ए. भांदक्कर.

(अं) स्मृतिदिन, पुण्यतिथि आदि समारंभ–

वि. १ मे ६१ रोजी नाटककार श्री. नाना जोग यांच्या तिसऱ्या स्मृति-दिनानिमित्त संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी त्यांच्या अर्धपुतळ्याला पुष्पहार घालून श्रद्धांजलि अर्पण केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंति–

दि. १४–४–६१ रोजी कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी जयंति साजरी करण्यात आली. यावेळी श्री. ना. रा. शेंडे यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

कै. ह. ना. नेने स्मृतिदिन–

दि. २२–११–६१ रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कै. ह. ना. नेने स्मृतिदिन समारंभ साजरा झाला. यावेळी म. म. डॉ. वा. वि. मिराशी, श्री. र. वि. कुलकर्णी, प्रा. ल. रा. कुलकर्णी, श्री. स. वि. लिमये आणि श्री. य. गो. मालोदे यांची भाषणे झाली.

कविवर्य श्री. अण्णाजी बोवडे यांचा २७ वा स्मृतिदिन–

दि. १–१०–६१ रोजी कविवर्य कै. अण्णासाहेब बोवडे यांचा २७ वा स्मृतिदिन वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात मोठ्या थाटात साजरा झाला. संघाचे उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी नियोजित अध्यक्ष न्या. मू. व्ही. ए. नाईक यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केल्यावर कै. बोवडे यांच्या तैलचित्राला वि. सा. संघ आणि सिटी क्लब या संस्थांचे वतीने हार घालण्यात आले. ॲड. ह. ना. वैद्य यांनी प्रास्तविक भाषण केल्यावर सौ. सरस्वती बापट यांनी कवि बोवडे यांच्या तीन कविता म्हणून दाखविल्या. अध्यक्ष न्या. मू. नाईक यांनी अध्यक्षीय भाषणात कविवर्य बोवडे यांच्या काव्यगुणांचा थोडक्यात

अनुक्रमणिका

पण उद्बोधक आढावा घेतला. नंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ॲड. श्री. बळवंतराव मंडलेकर यांचे भाषण झाले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. गो. स. देहाडराय चिटणीस वि. सा. संघ यांनी आभार मानले. यावेळी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे आणि श्री. आ. रा. देशपांडे यांनी समारंभानिमित्त पाठविलेली पत्रे वाचून दाखविण्यात आली. या समारंभाचे वेळी सिटी क्लब या संस्थेने वि. सा. संघाला रु. ५१ ची देणगी दिली.

दुखवटयाच्या सभा

(अ) 'उदय'चे मुख्यसंपादक आणि नाटककार श्री. ना. रा. उर्फ नानासाहेब वामणगावकर हे दि. ८–७–६१ रोजी अमरावती येथे निधन पावले. त्यानिमित्त दि. १२–७–६१ रोजी वि. सा. संघातर्फे दुखवटयाची सभा होऊन त्यात श्री. ग. त्र्यं. माडखोलकर श्री. य. गो. मालोदे, श्री. ज. रा. जोशी आणि श्री. हृ. मा. उपाध्ये यांची भाषणे झाली. नंतर संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी दुखवटयाचा ठराव मांडला आणि श्रद्धांजलि अर्पण केली.

(आ) विदर्भ साहित्य संघाच्या गोंदिया शाखेचे अध्यक्ष श्री. छोटुसाभाई क्षत्रिय यांच्या आकस्मिक निधनाबद्दल दुखवटयाची सभा वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयात दि. १५–९–६१ रोजी संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखाली भरली. यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. बाबुराव चिमोटे यांची भाषणें झाली. नंतर श्री. ना. रा. शेंडे आणि प्रा. श्री. गो. काशीकर यांनी त्यांचेविषयी ठराव मांडला व श्रद्धाजलि अर्पण केली.

(इ) महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध साहित्यिक आणि टीकाकार प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या आकस्मिक निधनानिमित्त दि. १९–११–६१ रोजी दुखवटयाची सभा घेण्यांत आली. याप्रसंगी प्रि. डॉ. वि. भि. कोलते, श्री. पं. द्वा. देशमुख, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. ग. त्र्यं. देशपांडे, श्री. ना. रा. शेंडे आणि प्रा. श्री. गो. काशीकर यांनी भाषणें करून श्रद्धाजलि अर्पण केली.

कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण:–

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ त्यांच्या महानिर्वाणदिनी, ६–१२–६१ रोजी सकाळी ८ वाजता संघाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली, ख्यातनाम साहित्यिक व पत्रपंडित श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते थाटाने साजरा करण्यात आला. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी तैलचित्राचे अनावरण केल्यावर भाषण दिले कु. सुगंधा शेंडे व अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचीहि भाषणें झाली.

डॉ. आंबेडकरांचे भव्य व सुंदर तैलचित्र, अमरावतीचे चित्रकार श्री. गुलाबराव नागदिवे यांनी तयार केले असून प्रस्तुत तैलचित्र कु. सुगंधा शेंडे आणि श्री. खेमराज हिरेखण यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिले.

रावसाहेब कै. गं. म. ठवरे यांच्या तैलचित्राचे अनावरण–

दि. १५ मार्च १९६२ रोजी सायं. ६ वा. वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात सामाजिक कार्यकर्ते व महानुभावीय वाङ्मयाचे अभ्यासक रा. सा. कै. गं. म. ठवरे यांच्या तैलचित्राच्या अनावरणाचा कार्यक्रम श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. ना. रा. शेंडे यांची भाषणे झाली. श्री. गं. म. ठवरे यांचे तैलचित्र अखिल भारतीय अस्पृश्य महानुभाव संघाकडून वि. सा. संघाला भेट म्हणून देण्यांत आले.

(अ:) वाशीम (वत्सगुल्म) येथील वि. सा. संघाचे २४ वे वार्षिक अधिवेशन

विदर्भ साहित्य संघाचे वार्षिक अधिवेशन वाशीम येथे दि. ३० व ३१ डिसेंबर ६१ रोजी मोठ्या थाटाने साजरे झाले.

या संमेलनाचे अध्यक्षस्थान म. म. साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांनी भूषविले होते. उद्‌घाटक म्हणून मध्यप्रदेशाचे राज्यपाल मा. श्री. हृ. वि. पाटसकर लाभले होते. संमेलनासाठी स्थानिक व विदर्भातील सर्व भागांतून अदमासे १५० प्रतिनिधि उपस्थित होते.

वत्सगुल्म येथील राणी लक्ष्मीबाई कन्या शाळेच्या प्रशस्त प्रांगणातील सभामंडपाला कवि राजशेखर सभामंडप व मुख्य प्रवेशिकेला 'राजे वाकाटक द्वार' असे नामाभिधान देऊन वाशीमकर कार्यकर्त्यांनी आपली कुशल योजकता दर्शविली, यात सन्देह नाही.

शनिवार दि. ३०–१२–६१ रोजी सकाळी ११ वाजता वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीची सभा झाली.

दुपारी २–३० वाजता विषयनियामक समितीची सभा भरून सम्मेलनापुढे येणारे १२ ठराव सम्मत करण्यात आले.

सायंकाळी ठीक ५ वाजता विद्युद्दीपांनी व लतापल्लवांनी शृंगारलेल्या राजशेखर सभामंडपात संमेलनाला सुरुवात झाली. प्रथम वैदिक प्रार्थना म्हणण्यात आल्यावर, श्री. ज्ञा. रा. साव यांनी सरस्वतीस्तवन म्हटले. नंतर, 'सुजन हो,

सुस्वागतम् आगता' हे मधुर, भावपूर्ण स्वागतगीत म्हणण्यात आल्यावर, संमेलनाचे कार्यवाह श्री. कृ. भ. देशपांडे यांनी संमेलनासाठी आलेले संदेश वाचून दाखविले. यानंतर स्वागताध्यक्ष, श्री. शं. गो. उर्फ अण्णासाहेब डवीर यांनी स्वागतपर भाषण केल्यावर उद्घाटक मा. ह. वि. पाटसकर यांचे उद्घाटनपर भाषण झाले. त्यानंतर त्यांच्या हस्ते साहित्य-कलाप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यावेळी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी प्रदर्शनाच्या वैशिष्ट्याचा परिचय करून दिला. साहित्य व कला यांचे मनोहर दर्शन घडविणाऱ्या या प्रदर्शनाची मांडणी केंद्रीय ग्रंथालयाचे मुख्य ग्रंथपाल श्री. म. वा. चिंचवडकर आणि 'प्रगति आर्टस्'चे चित्रकार श्री. दि. के. मनोहर यांनी वेधक व बोलक्या स्वरूपात केली होती. या प्रदर्शनात डॉ. य. खु. देशपांडे, श्री. दे. गो. लांडगे प्रभृति नामवंत संशोधकांनीही पुराण वस्तुसाहित्याचे दर्शन घडविले. पुसदचे श्री. पेन्शनवार यांचा नाण्यांचा व तिकिटांचा संग्रहहि उल्लेखनीय होता.

अध्यक्षपदासाठी सूचक व अनुमोदकांची भाषणे झाल्यावर संमेलनाध्यक्ष श्री. बाळशास्त्री हरदास यांचे विचार-परिप्लुत असे अध्यक्षीय भाषण झाले.

रात्री १० वा. 'काव्यग्रंथ प्रकाशन व कविसंमेलन' असा सुंदर जोड-कार्यक्रम झाला. प्रथम कवि श्री. आनंदराव टेकाडे यांच्या 'आनंदगीत' भाग ४ था या काव्यसंग्रहाचे आणि वाशीम येथील कवि श्री. ज्ञा. रा. साधु यांच्या 'पयोष्णी' या काव्यसंग्रहाचे तसेच अमरावतीच्या श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी यांच्या 'संस्कृति-रंगदर्शन' या काव्य-नाटचसंग्रहाचे संमेलनाध्यक्ष साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

यानंतर नामवंत कवि प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली कवि-संमेलन झाले. या संमेलनात सर्वश्री ना. रा. शेंडे, तु. ना. काटकर, शरच्चंद्र सिंह, लक्ष्मीकांत मानेकर, सौ. सुनंदा पांडे, वि. रा. गिरी, मधुकर खोकले, पंचभाई (रिसोड,) श्री. भ. पाटील, ज. य. कायंदे, ह. रा. हिवरे, कु. इंदुताई भजने, वा. के. अत्रे, वा. रा. पाठक, कृष्णा चौधरी, वि. शं. जोशी, प्रभाकर हवालदार, सौ. सुधाताई राजे, नागेश कुलकर्णी, कु. प्रभा देव, लि. शं. ठोंबरे, कु. दुर्गा कानगो, प्रा. सुरेश म. डोळके, बाबुराव कात्यायन, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. दा. ल. अडोणी, श्री. द. चिं. सोमण, प्राचार्य ज्ञा. रा. साधु, पु. मा. देशमुख, व प्रा. भ. श्री. पंडित, यांनी भाग घतला.

रविवार दि. ३१-१२-६१ रोजी सकाळी ९ वा. 'गद्यग्रंथप्रकाशन व परिसंवाद' अशा जोड कार्यक्रमाने संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाला सुरुवात झाली.

नागपूरचे एक कवि व लेखक श्री. स. त्रि. लिमये लिखित 'मुक्तद्वार' या पुस्तकाचे व प्राचार्य वि. प्र. मोहगावकर लिखित 'साहित्य साधना' या पुस्तकाचे संमेलनाध्यक्ष श्री. बाळाशास्त्री हरदास यांनी प्रकाशन झाल्याचे जाहीर केले.

नंतर 'महाराष्ट्रातील भागवतधर्माच्या संतसाहित्याचे स्वरूप व कार्य' या विषयावर उत्कृष्ट परिसंवाद झाला. श्रीज्ञानेश्वरासंबंधी प्रा. श्री. मा. कुलकर्णी, नामदेवासंबंधी प्रा. सुरेश म. डोळके, एकनाथाविषयी प्रा. भ. श्रा. पंडित, तुकारामासंबंधी प्रा. वि. प्र मोहगावकर व रामदासासंबंधी प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांची विद्वत्ताप्रचुर भाषणे झाली. या परिसंवादाचा संमेलनाध्यक्षांनी विचारप्रवण शब्दात समारोप केला.

दुपारी १२ वाजता सर्व प्रतिनिधींना व कार्यकर्त्यांना स्वागतमंडळाने थाटाची मेजवानी केली.

दुपारी २–३० वाजता ठिकठिकाणाहून आलेल्या प्रतिनिधींच्या परस्पर-परिचयाचा कार्यक्रम झाला. नंतर वि. सा. संघाची साधारण सभा झाली.

दुपारी ४ वाजता वाशीम येथील प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्याचा स्वागतमंडळाने एक कार्यक्रम आयोजित केला होता.

सायंकाळी ५–३० वा. स्वागतमंडळ व वाशीमकर मंडळीतर्फे डॉ. य. खु. देशपांडे यांच्या संशोधनपर महत्वपूर्ण कार्याबद्दल गौरव करण्यात आला. त्यावेळी श्री. बाबासाहेब धनागरे व श्री. बाळासाहेब ढवळे यांची डॉ. य. खु देशपांडे यांच्या कामगिरीबद्दल भाषणे झाली.

यानंतर खुल्या अधिवेशनाला सुरूवात झाली. अधिवेशनापुढे पुढील प्रकारचे १२ ठराव मंजूर झाले व ते सर्व एकमताने मंजूर झाले.

(१) वि. सा. संघाच्या पूर्वाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांना श्रद्धांजलि अर्पण.

(२) दिवंगत साहित्यिक आणि समाजकार्यकर्ते यांना श्रद्धांजलि.

(३) सांस्कृतिक व्यासपीठाच्या योजनेला सर्व संस्थांकडून चालना मिळण्या-संबंधी.

(४) परराज्यात गेलेले मराठी जिल्हे यांचा महाराष्ट्रात समावेश करणे, गोमंतक महाराष्ट्रात समाविष्ट व्हावा, अशी विनंती.

(५) रामटेक येथे कवि कालिदास, पद्मपूर येथे भवभूतीचे आणि आंभोरा येथे आद्य मराठी कवि श्री. मुकुंदराजांचे स्मारक उभारण्यास सर-कारला विनंती.

(६) नाटककार गडकरी यांचे सावनेर येथील घर ताब्यात घेण्यासंबंधी.

(७) गावांची नावे बदलण्यासंबंधी विनंती.

(८) पुराणवस्तु खात्याचे कार्यालय विदर्भासाठी सुरू करण्यास विनंती.

(९) गोवा प्रांत भारत सरकारने न्याय्य मार्गाने मिळविल्याबद्दल आणि भारतीय सैनिकांनी केलेल्या पराक्रमाबद्दल अभिनंदन.

(१०) विदर्भातील बोलभाषांच्या अध्ययनाला चालना देणे; मराठी भाषा समृद्ध करण्याच्या दृष्टीने सरकारला विनंती.

(११) मिश्रभाषा बोलण्याची, वापरण्याची सवय सोडणे आणि मराठी भाषा शुद्ध व समृद्ध राखण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या तत्संबंधी कार्याला पूरक म्हणून मराठी साहित्य महामंडळाने कार्य करावे, अशी विनंती.

(१२) संस्कृत भाषा अध्ययनाचे दृष्टीने भारत शासनास विनंती.

रात्री १० वाजता वाशीम येथील 'सुरुचि साधना' या नाटयसंस्थेतर्फे "प्रेमा तुझा रंग कसा" हा नाटचप्रयोग सादर करण्यात आला.

(क) वि. सा. संघाच्या शाखांचे कार्य–

१. खामगाव शाखा–

प्राचार्य श्री. ना. वा. पराडकर यांचे "नाटकार कोल्हटकर" या विषयावर भाषण झाले. याचवेळी गो. से. महाविद्यालयातील संस्कृतचे प्राध्यापक श्री. स. आ. डांगे यांचा नागपूर विद्यापीठाकडून Ph.D. उपाधि मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

दि. ७ मे रोजी गुरुदेव टागोर जन्मशताब्दि–निमित्त आमदार श्री. गोविंददास भाटिया यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. यावेळी प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, श्री. भवरलाल सेवक, श्री. पंधे गुरुजी, डॉ. डेकाटे आदि वक्त्यांची भाषणे झाली. याप्रसंगी एक लहानसे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या समारंभाचे वेळी पं. मोतीलाल नेहरू यांच्याहि जन्म शताब्दि–निमित्त त्यांच्या स्मृतीला आदरांजलि वाहण्यात आली.

२. गोंदिया शाखा–

दि. १४ सप्टेंबर रोजी गोंदिया शाखेचे अध्यक्ष श्रीमान् छोटुभाई क्षत्रिय यांच्या आकस्मिक निधनानिमित्त शोकसभा झाली. यावेळी त्यांच्या प्रीत्यर्थ बांधण्यांत यावयाच्या ग्रंथालयाच्या इमारतीसाठी निधि जमविण्याचे ठरले. यावेळी अनेक व्यक्तींनी देणग्या जाहीर केल्या.

गोंदिया शाखेचें अध्यक्ष म्हणून श्रीमान् के. के. घोटे यांची सर्वानुमतें निवड झाली.

शाखेतर्फे दि. १४ जानेवारी ६२ रोजी वि. सा. संघाचा ३९ वा वर्धापन-दिन साजरा करण्यात आला.

दि. १०–२–६२ रोजी प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे भाषण झाले.

३. सावनेर शाखा–

सावनेर शाखेची साधारण सभा दि. १–७–६१ रोजी झाली. या सभेत सावनेर येथे कै. रा. ग. गडकरी वाचनालय सुरू करण्याचे ठरले. यावेळी अनेक साहित्यप्रेमी व्यक्तींनी स्वत: जवळील मासिके, पुस्तके देण्याचे आश्वासन दिले. डॉ. कुळकर्णी यांनी कै. गडकरी यांचे छायाचित्र तयार करून देण्याचे आश्वासन दिले.

दि. २३ जानेवारी ६२ रोजी नाटकार कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिन, शाखाध्यक्ष श्री. पुरुषोत्तमभाई पटेल यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. यावेळी प्रा. म. शं. वावगावकर यांचे भाषण झाले.

४. काटोल शाखा–

दि. ७–९–६१ रोजी शाखा उद्घाटनाचा कार्यक्रम महाराष्ट्राचे समाज-कल्याण मंत्री डॉ. त्रि. रा. नरवणे यांचे हस्ते झाला. यावेळी वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे उपस्थित होते.

दि. ११ ऑक्टोबर रोजी श्री. वसंतराव वरखेडकर यांचे "सत्तावन सेनानी" ह्या कादंबरीवर सुश्राव्य भाषण झाले.

दि. ३–११–६१ रोजी कवि–संमेलनाचा कार्यक्रम झाला. या कवि संमेलनात स्थानिक नवोदित कवींनी उत्साहाने भाग घेतला.

दि. ५–१२–६१ रोजी श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथि साजरी करण्यात आली. त्यावेळी "हितवाद"चे सहसंपादक श्री. पंढरीनाथ रानडे यांचे व्याख्यान झाले. श्री. रघुनंदनप्रसाद पाठक यांनी गीता आणि ज्ञानेश्वरी यातील तत्वज्ञानतत्त्वांची समर्थक तुलना केलेले स्वकृत काव्य म्हणून दाखविले.

दि. ९–१२–६१ रोजी प्रा. द. मा. मुनशी यांचे अध्यक्षतेखाली कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या दु:खदनिधनानिमित्त दुखवटयाची सभा घेण्यात आली. यावेळी स्थानिक कार्यकर्त्यांनीहि श्रद्धांजलि अर्पण केली.

दि. २५–१–६१ रोजी कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिन साजरा झाला. याप्रसंगी प्रा. म. ना. लोही यांचे "नाटकार गडकरी" या विषयावर आणि प्रा. कु. पद्मा देशकर यांचे "कवि गडकरी" या विषयावर अभ्यासपूर्ण भाषणे झालीत.

वि. सा. संघाचा ३९ वा वर्धापनदिन, दि. १४ जानेवारी रोजी शाखाध्यक्ष श्री. क. भ. हरजाल यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य श्री. के. मा. मुनशी खामगांव, यांचे "अद्वैतदृष्टि" या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण झाले.

५. पुलगाव शाखा–

दि. १६–७–६१ रोजी पुलगाव शाखेच्या सभासदांची सभा झाली. या सभेत शाखा कार्याच्या दृष्टीने विचारविनियय होऊन निरनिराळे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले.

६. उमरेड शाखा–

दि. १ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथि साजरी करण्यात आली. शाखाध्यक्ष श्री. भय्याजी चक्रदेव यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते. शाखेचे कार्यकर्ते श्री विचुरे, श्री. रा द. जोशी आणि श्री. श्री. मं. पोकळी यांची भाषणे झालीत. या प्रसंगीं वि. सा. संघाच्या परीक्षांना बसून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

७ वणी शाखा–

वणीशाखेची साधारण सभा दि. ६–१०–६१ रोजी संघाध्यक्ष श्री. ना, रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यासभेत मागील वर्षाच्या जमाखर्चाला मंजुरी देण्यात आली. आणि नवीन कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली.

शाखेचे उत्साही कार्यकर्ते श्री. ल. श्री. खडक्कार यांची नागपूर येथे बदली झाल्यामुळे त्यांना निरोप देण्याचा समारंभ, दि. १३–१०–६१ रोजी डॉ. द. ह. अग्निहोत्री यांचे अध्यक्षतेखाली झाला.

दि. २३–१२–६१ रोजी श्रीमती लक्ष्मीबाई केळकर यांचे "प्रभुरामचंद्राचे आदर्श जीवन" या विषयावर उद्बोधक भाषण झाले.

दि. २१–१२–६१ रोजी, कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाची सभा झाली. यावेळी स्थानिक कार्यकर्त्यांनी आणि उपस्थितांनी श्रद्धांजलि अर्पण केली.

वि. सा. संघाचा ३९ वा वर्धापनदिन दि. १९–१–६१ रोजी आचार्या. द. ह. अग्निहोत्री यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला यावेळी श्री. म. ता. राजूरकर, श्री. के. ना. काटपाताळ, श्री. ना. मा. सरपटवार, श्री. रा. वि. दामले व श्रीमती इंदुताई कळमकर यांची भाषणे झाली.

८ आर्वी शाखा–

दि. १८-८-६१ रोजी आर्वी शाखेच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यचे समाज कल्याण मंत्री डॉ. त्रि. रा. नरवणे यांचे हस्ते झाला. या कार्यक्रमासाठी वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर उपस्थित होते.

शाखेची सर्वसाधारणसभा, दि. ५ डिसेंबर रोजी श्री. वा. र. पराडकर यांचे अध्यक्षतेखाली होऊन, कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांना श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली.

९ गोंडवन शाखा–चंद्रपूरः–

शाखेतर्फे दि. ३०–११–६१ रोजी, शाखाध्यक्ष श्री. भ. सो. खनके यांचे अध्यक्षतेखाली, कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाची सभा झाली. यावेळी श्री. न. रा. निमजे, श्री. तु. ना. काटकर, श्री. ग. गं. कुंजलवार, श्री. एकनाथ साळवे, श्री. ज. गो. संत, श्री. म. वा. देव, सौ. देवईकर, श्री. मामासाहेब ओक, श्री. गो. ब. पुल्लीवार, श्री. बाबुरावजी आवळे आणि श्री. भ. सो. खनके यांची भाषणे होऊन श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली.

कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे–वादस्पर्धाः–

शाखेतर्फे दि. १७–१२–६१ रोजी "कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे वादस्पर्धा" घेण्यात आली. यास्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल नागपूरच्या श्री. बिंझाणी नगर माहाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. मुकुंद सावळापूरकर यांनी "त्रिवेदी ढाल" मिळविली. श्री. सावळापूरकर यांचा, उत्कृष्ट भाषणाबद्दल "श्री. शांताराम पोटदुखे मानचिन्ह" देऊन गौरव करण्यात आला. दुसऱ्या क्रमांकाचे "शालिग्राम गवालपंची ' वैयक्तिक पारितोपिक स्थानिक कन्या शाळेच्या विद्यार्थिनी कु. जोत्स्ना राजे यांना देण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांना निमंत्रित करण्यात आले.

दि. ४–१–६२ रोजी अमरावतीचे प्रा. भाऊ मांडवकर यांचे "लोकवाङ्‌मय" या विपायावर भापण झाले.

दि. ८–१–६२ रोजी प्रा. पां. कृ. सावळपूरकर याचे "साहित्याचे कार्य" या विपयावर भापण झाले.

अखिल भारतीय गांधी पुरस्कार विजेते, कादंबरीकार व पत्रकार श्री. अनंत गोपाळ शेवडे यांनी दि. २२–१–६२ रोजी शाखेला भेट दिली. त्यावेळी प्रांतीय संचालक पं. हृषीकेशजी शर्मा यांचे अध्यक्षतेखाली श्री. शेवडे यांचे भापण झाले.

१० तळोधी शाखा–

दि. १–८–६१ रोजी लो. टिळक पुण्यतिथि साजरी करण्यात आली.

पुणेपूरपीडितांना साहाय्य म्हणून शाखेच्या वतीने २३२ रु. पाठविण्यात आले.

स्वातंत्र्यदिनानिमित्त, म्हणजे दि. १५–८–६१ रोजी शाखेतर्फे झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला. तदनंतर शाखाध्यक्ष श्री. गोविंदरावजी मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन त्यात सर्वश्री प्रभाकर तलारवार, कृष्णा लाडसे, नामदेव वानखेडे, वोंदरुजी कामडे, न. रा. गजभे आदींची भाषणें झाली.

दि. २७–११–६१ रोजी शाखाध्यक्ष श्री. गोविंदरावजी मेश्राम यांचे अध्यक्षतेखाली म. ज्योतिबा फुले यांची ७१ वी पुण्यतिथि साजरी झाली.

दि. १–१२–६१ रोजी, कै. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या दुःखद निधनानिमित्त, श्री. दिवाकर पोशट्टीवार यांचे अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. त्यांवेळी दुखवटयाचा ठराव मांडून श्रद्धांजलि अर्पण केली. शेवटी श्री. कृष्णा लाडसे यांनी शोक गीत म्हटल्यावर सभा संपली.

शाखेतर्फे दि. १४ जानेवारी ६२ रोजी वि. सा. संघाचा ३९ वा वर्धापन-दिन साजरा करण्यांत आला. यावेळी श्री. कृष्णा लाडसे, श्री. र. न. गजभे यांची भापणे झालीत.

११ पुसद शाखा–

दि. १०–१०–६१ रोजी पुसदशाखेच्या सभासदांची सभा घेण्यात येऊन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले.

शाखेतर्फे दि. १४ नोव्हेंबर रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती-निमित्त "बालक दिन" साजरा करण्यात आला.

शाखेने आयोजित केलेल्या एका व्याख्यानमालेचे उद्घाटन दि. २५-१२-६१ रोजी, किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या हस्ते झाले. यावेळी "मी पाहिलेली अमेरिका" या विषयावर त्यांचे माहितीपूर्ण भाषण झाले.

याशिवाय प्रा. राम शेवाळकर, प्राचार्य देशमुख, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. अ. गो. शेवडे यांची भाषणे झाली.

दि. १ जानेवारी ६२ रोजी माननीय श्री. मधुसूदन वैराळे उपमंत्री म. राज्य यांचे "उर्दू काव्यातील सौंदर्यस्थळें" या विषयावर भाषण झाले.

१२ वत्सगुल्म (वाशीम) शाखा—

वाशीम शाखेची साधारण सभा दि. ७–८–६१ रोजी झाली. या सभेत विदर्भ साहित्य संघाचे २४ वे साहित्य संमेलन भरविण्याचा निर्णय घेण्यात येऊन केंद्रीय कार्यालयाला रीतसर निमंत्रण देणारा अर्ज पाठविण्यात आला. त्यादृष्टीने वाशीम शाखेने प्रयत्न केला व दि. ३० आणि ३१ डिसेंबर ६१ रोजी संमेलन घडवून आणले.

१३ वर्धा शाखा—

दि. २७–९–६१ रोजी शाखेच्या वतीने "काळ"कर्ते कै. शि. म. परांजपे यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. यावेळी प्रा. जावडेकर यांनी "काळ-कर्त्यांचे व्यक्तिमत्व" आणि प्रा. कावळे यांनी "काळा"ची वैशिष्टयें" या विषयावर भाषणे दिली.

दि. ९–११–६१ रोजी कादंबरीकार सौ. मालतीबाई बेडेकर यांचे "कादंबरीकाराच्या मनाची घडण" याविषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती उषाताई देशमुख यांनी मंडित केले होते.

१४ यवतमाळ शाखा—

शाखेची दि. ११–८–६१ रोजी सर्वसाधारण सभा झाली.

स्थानिक संमेलन

शाखेचे स्थानिक संमेलन दि. २९–१०–६१ रोजी प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली, स्थानिक नगरपालिकेच्या सभागृहात पार पडले. यावेळी शाखाध्यक्ष डॉ. गो. वा. पंडित यांनी स्वागतपर भाषण केले. शाखेचे कार्यवाह श्री. विनायकराव पाटील यांनी शाखेच्या कार्याची माहिती दिली. नंतर डॉ. अ. ना. देशपांडे यांचे साहित्याचा आढावा घेणारे उद्बोधक भाषण झाले. या संमेलनासाठी वि. सा. संघाचे सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर उपस्थित होते.

सायं. ५ वाजता स्थानिक रेडक्रॉसभवनात अनौपचारिक सभा आणि चहा-पानाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९ वाजता प्रा. वसंत कानेटकर लिखित "प्रेमा तुझा रंग कसा" ह्या नाटकाचा सुंदर प्रयोग स्थानिक कलाकारांनी सादर केला. दुसरे दिवशी कविसंमेलन आणि परिसंवाद आदि कार्यक्रम झाल्यावर संमेलन संपले.

१५ नांदूरा शाखा—

विदर्भ साहित्य संघाची शाखा नांदूरा जि. बुलढाणा या गावी स्थापन कर-ण्यास केंद्रीय कार्यकारी मंडळाने अनुमति दिली.

स्थानिक कार्यकर्ते डॉ. अनिक मराठे आणि इतर मंडळी वि. सा. संघाचे अधिक प्रमाणात सभासद करण्याचे कार्य उत्साहाने करीत आहेत.

वि. सा. संघ धनवटे रंगमंदिर

आमंत्रक—श्री. बाळासाहेब ढवळे
सहआमंत्रक—श्री. बाबुराव चिमोटे

अहवालाचे खाली रंगमंदिरात खालील कार्यक्रम झाले.

मराठी नाटके	हिंदी नाटके	इतर भाषातील नाटके	संगीत, नृत्य इ.	सभा संमेलन इत्यादि
५४	१५	१३	५८	२९

उत्पन्न

चालूसाली रंगमंदिराला खालील प्रमाणे उत्पन्न मिळाले.

(१) रंगमंदिराचे भाडे रु. ३०,३०२=००
(२) सायकल स्टँडचे उत्पन्न रु. १९७७=१५

देणगी

यंदा श्री. केशवराव वोकाडे यांनी रंगमंदिराला रु. २०१ ची देणगी, ड्रॉप तयार करण्याकरिता दिली.

कर्ज

कर्जापोटी रंगमंदिराला चालू वर्षात (१९६२–६३) एकूण रु. ९०००/- देणे आहेत.

रंगमंदिर समितिः—

अहवालाचे साली रंगमंदिर समितीच्या तीन सभा झाल्या.

(का) "पूरपीडित साहाय्य निधि"ला विदर्भ साहित्य संघाकडून मदतः—

(१) विदर्भ साहित्य संघाचे वतीने पुणे पूर पीडित निधीला मदत म्हणून रु. १०१/- चा धनादेश देण्यात आला.

(२) विदर्भ पूरपीडित निधीला मदत म्हणून रु. १५०/- चा धनादेश देण्यात आला.

(कि) वि. सा. संघाला देणग्या—

(१) कै. कविवर्य श्री. अण्णाजी वोवडे यांच्या स्मृतिदिनी नागपूरच्या सिटी क्लबचे वतीने वि. सा. संघाला रु. ५०/- ची देणगी मिळाली.

(२) डॉ. ना. भा. खरे यांचे चिरंजीव डॉ. व्ही. अेन्. खरे यांनी डॉक्टर-साहेबांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त रु. २५/– ची देणगी दिली.

वरील देणगीदारांचा विदर्भ साहित्य संघ अत्यंत आभारी आहे.

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र शासन आणि केंद्रशासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले.—

(१ महाराष्ट्र राज्यशासन–(अ) वार्षिक अनुदान ७,० ८२ रुपये
(आ) वार्षिक साहित्य संमेलन ५०० रुपये
(इ) "मराठी वर्णोच्चार विकास" ग्रंथासाठी ५००० रुपये
(ई) नाटयसमितीकरिता ५०० रुपये

(२) केंद्र सरकार दिल्ली यांचेकड्न श्रीशिवाजी ग्रंथालय बांधकामासाठी मिळालेल्या एकूण २,०००० रुपयांपैकी . १०००० चा दुसरा हप्ता आला.

वि. सा. संघ महाराष्ट्र शासनचे आणि केंद्रीय शासनाचे अत्यंत आभारी आहे.

आभार–

यावर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास शेकडो कार्यकर्त्यांचे, दात्यांचे, सभासदांचे व संस्थांचे साहाय्य झाले आहे. वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

आपले,

ना. रा. शेंडे
अध्यक्ष

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस

य. गो. मालोदे
गो. स. देहाडराय
तु. ना. काटकर
चिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९६१–६२

तपशील	आय		तपशील	व्यय
		रुपये न. पैसे		रुपये न. पैसे
आरंभीची शिल्लक			निलंबितखाते (सस्पेन्स)	२४२–२८
शिल्लक जवळ	७८२–४९		वेतन खर्च	५,२०४–५६
नाट्यसमिति	२००–००		दूरध्वनि	८३५–५७
परीक्षा समिति	५४२–६८		डाक व्यय	४०२–८९
सरकारी अनुदान	९५००–००		मुद्रण व लेखण सामुग्री	८४४–८२
मुदती ठेव	११,५००–००		युगवाणी मुद्रण	४,७०७–३१
बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	५११–८५		वाहन व प्रवास खर्च	१,३४१–८३
बँक ऑफ महाराष्ट्र (वि. फं.)	२२५४–५३		किरकोळ खर्च	१२७–२१
विदर्भ प्रिमियर को. ऑ–हाऊसिंग			सांस्कृतिक कार्यक्रम समिति	४५९५–२१
सोसायटी	१४,७७९–१९		गडकरी स्मारक समिति	१५३–४३
भविष्यनिधि	३९९–४८		नाट्य समिति	१५५१–०७
रंगमंदिर शिल्लक	७६१–१४	४१,२३१–३६	वर्धापन दिन	२४–४१
साधारण सभासद वर्गणी		३,७९५–००	आतिथ्य	१०५–४०
संलग्नसंस्था		१५–००	वीज खर्च	४६९–३७
	पुढे चालू	४५,०४१–३६	पुढे चालू	२०,६०५–३६

मागील पानावरून	४५,०४१–३६	मागील पानावरून	२०,६०५–३६
आजीव सभासद वर्गणी	७०१–००	परीक्षा समिति	२३७२–७१
पुस्तक विक्री	२०८–९७	कार्यालयीन व्यवस्था व शाखा सहाय्य	१४६९–९४
व्याज	३४५–२१	अधिकोष वर्तन (बँक कमिशन)	४–४०
परीक्षा शुल्क	३,८९८–४४	वस्तु खरेदी	१,१०७–९०
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	६,०७२–३५	अंकेक्षण शुल्क (ऑडिट फी) यंदाचें रु. ५०+अदत्त रु. १००	१५०–००
देणग्या	७६–००	शाखा अंशदान	३३४–५०
सरकारी अनुदान	७०८२–००	गडकरी ग्रन्थालय व पुस्तक खरेदी	२७५–१७
किरकोळ उत्पन्न	६०२–४९	कर्मचारी अग्रिमा	२–००
नाटचसमिति (सरकारी अनुदान रु. १०००/–)	१२१०–००	साहित्य मंदिर बांधकाम	१६०४–४७
नाटचस्पर्धा	२५–५०	मराठी साहित्य महा मंडळ	१००–००
युगवाणी वर्गणी	१००–००	कार्यकारी मंडळ निवडणूक	१,४९७–८३
भविष्यनिधि	१९८–०४	वट्टेखाते	३–८६
कै. रानडे वादस्पर्धा	३५९–७३	श्री. शिवाजी ग्रंग्रालय किरकोळ खर्च	१७७–४६
तात्पुरते कर्ज (रंगमंदिराकडून)	३०००–००	श्री. शिवाजी ग्रंथालय बांधकामाचा अग्रिमा	
श्री. खांडेकर सत्कार निधि	२०६–०३	(ठेकेदार श्री. जोग)	३०००–००
कै. नाना जोग स्मारक	११३–१३	स्थितनिक्षेप परत रंगमंदिर	८०००–००
ग्रन्थ संपादन व प्रकाशन (सरकारी अनुदान रु. ५०००)	५०२५–००	दिलेले व्याज	१३४२–६२
नाटच सम्मेलन	६१–०१	अधिकोष वर्तन	३–३९
पुढे चालू	७४,३२६–२६	पुढे चालू	४२,०५१–६१

मागील पानावरून	७४,३२६–२६	मागील पानावरून		४२,०५१–६१
श्री. शिवाजी ग्रंथालय देणग्या व		तात्पुरते कर्ज (विदर्भ साहित्य संघ) रंगमंदिर		३०००–००
इतर उत्पन्न	५०१८–००	मंदिर रचना		४,९०४–६२
श्री. शिवाजी ग्रंथालय सरकारी अनुदान	१०,०००–००	रंगमंदिर खर्च व वस्तु खरेदी		१,२०६–३८
श्री. शिवाजी ग्रंथालय व्याज	११–६९	देखरेख ,,		७३२०–००
श्री. शिवाजी ग्रंथालय किरकोळ खर्च		दूरध्वनि		४३८–८०
(१९६०–६१) बांधकामाकडे	१५६–२७	वीज खर्च		४,५६२–४१
अदत्त अंकेक्षण शुल्क		कर इत्यादि		२,४७२–५६
१९६१–६२ (श्री. महेश्वर गद्रे आ. कं.)	१००–००	मुद्रण व लेखन सामुग्री		३३०–५०
रंगमंदिर देणग्या	२०१–००	इमारत विम्याचा हप्ता ,,		६३७–५०
रंगमंदिर भाडे इत्यादि	३२,२७९–१५	नाट्यममिति रु.२००+परीक्षा समिति ५४२=६८		
		हिशेब येणे		७४२–६८
		शिल्लक:– शिल्लक जवळ	६८१–७९	
		दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	७,७१७–०२	
		(बि. फं.)	८१६–२४	
		,, (नाट्य सम्मेलन)	५३–०९	
		,, (श्री. शिवाजी ग्रंथालय)	२०,८५७–२३	
		विदर्भ को. ऑ. हाऊसिंग सोसायटी	१,६७१–४४	
		भविष्यनिधि	६६६–७०	
	१,२२,०९२–३७	पुढे चालू	३२,४६३–५१	६७,६६७–०६

मागील पानावरून	१,२२,०९२–३७	मागील पानावरून	३२,४६३–५१	६७,६६७–०६
		मुदती ठेव*	२१,५०१–००	
		रंगमंदिर शिल्लक	४६०–८०	५४,४२५–३१
				१,२२,०९२–३७
		*डॉ शिंगणापूरकर पारितोषिक	रु. ५००–००	
	१,२२,०९२–३७	स्थितनिक्षेप विदर्भ प्रि. को. ऑ. हा. सोसायटी	११००१–००	
		१२ वर्षे नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स	२,०००–००	
		श्री. गणेशव्याख्यानमाला १० वर्षे ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकेट्स	६,०००–००	
		विश्वस्तांच्या नांवे हिंद फिन	२,०००–००	
		एकूण	२१,५०१–००	

तपासले ते बरोबर आहेत.

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
१५–७–६२

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

(१-४-१९६१ ते ३१-३-१९६२) ३१ मार्च १९६२ ला संपणाऱ्या आय-व्ययाचा तक्ता.

तपशील	आय	तपशील	व्यय
	रु. नये पैसे		रुपये न. पैसे
साधारण सभासद वर्गणी	३७९५-००	वेतन खर्च	५,२०४-५६
संलग्न संस्था	१५-००	डाक व्यय	४०२-८९
परीक्षा शुल्क	३,८९८-४४	दूरध्वनि	८३५-५७
किरकोळ जमा	६०२-४९	मुद्रण व लेखनसामुग्री	८४४-८२
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	६,०७२-३५	युगवाणी मुद्रण	४,७०७-३१
नाट्य समिति (सरकारी अनुदान रु. १०००)	१२१०-००	वाहन व प्रवास खर्च	१,३४१-८३
नाट्य स्पर्धा	२५-५०	किरकोळ खर्च	१२७-२१
पुस्तक विक्रि	२०८-९७	सांस्कृतिक कार्यक्रम समिति	४,५९५-२१
ठेवीवरील व्याज	३४५-२१	गडकरी स्मारक समिति	१५३-४३
युगवाणी वर्गणी	१००-००	नाट्य समिति	१,५५१-०७
सरकारी अनुदान	७०८२-००	आतिथ्य	१०५-४०
देणग्या	७६-००	परीक्षा समिति	२,३७२-७१
ग्रंथ संपादन व प्रकाशन (मागील वर्षापैकी परत)	२५-००	कार्यालयीन व्यवस्था व शाखा सहाय्य	१,४६९-९४
पुढे चालू	२३,४५५-९६	पुढे चालू	२३,७११-९५

अनुक्रमणिका

मागील पानावरून	२३,४५५–९६	मागील पानावरून	२३,७११–९५
नाट्यसम्मेलन	६१–०१	वीज खर्च	४६९–३७
कै. रानडे वादस्पर्धा	३५९–७३	अधिकोष वर्तन (बँक कमिशन)	४–४०
उत्पन्नापेक्षा खर्च जास्त	२,५९७–०८	अंकेक्षण शुल्क (आडिट् फी)	
		यंदाचे रु. ५० + अदत्त रु. १००	१५०–००
		शाखा अंशदान	३३४–५०
		वर्धापन दिन	२४–४१
		मराठी साहित्य महामंडळ	१००–००
		कार्यकारी मंडळ निवडणूक	१,४९७–८३
		वट्टे खाते	३–८६
		श्री शिवाजी ग्रंथालय किरकोळ खर्च	१७७–४६
	२६,४७३–७८		२६,४७३–७८

तपासले ते बरोबर आहेत.

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
१५–७–६२

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

३१ मार्च १९६२ चे स्थिति–विवरण (बॅलन्स–शीट)

फंड व लायबिलिटीज

		रुपये न. पै.	रुपये न. पै.
मंदिर निधि	मागील	२,१३,६०९–५५	
	यंदाचे	१४,१६५–९९	२.२७,७७५–५४
सरकारी अनुदान	मागील		२,४१,९७३–००
स्थित निक्षेप (फिक्सड् डिपॉझिट)	मागील	१७,०००–००	
	यंदा दिले	८,०००–००	९,०००–००
तात्पुरते कर्ज	मागील		२,७५९–५०
व्यापारी देणे	मागील		४७,८९९–६७
अदत्त अंकेक्षण शुल्क (महेश्वर गद्रे आणि कं.)			१००–००
आजीव सभासद	मागील	८,२३२–००	
	यंदाचे	७०१–००	८,९३३–००
क. बेहेरे व्याख्यान माला	मागील		६,०००–००
	पुढे चालू		५,४४,४४०–७१

ॲसेटस् व प्रॉपर्टी

		रुपये न. पै.	रुपये न. पै.
मंदिर रचना	मागील	५,४०,१७२–२९	
	यंदाचे	६,५०९–०९	५,४६,६८१–३८
टिनशेड व विहीर	मागील		५,३४१–८६
इमारती बांधकामाचा अग्रिमा	मागील		५,३६०–९६
उपस्कर व इतर सामान	मागील	९,४१९–८२	
	यंदाचे	१,१०७–९०	१०,५२७–७२
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)	मागील	१,६७३–४२	
	यंदाचे	२७५–१७	१,९४८–५९
विद्युत व दूरध्वनि स्थितनिक्षेप (डिपॉझिट)	मागील		४८१–००
कं. गडकरी तैलचित्र	मागील		३००–००
		पुढे चालू	५,७०,६४१–५१

	मागील पानावरून		५,४४,४४०–७१
श्रीगणेश व्याख्यानमाला	मागील		६,०००–००
श्री खांडेकर सत्कार निधि			
(परितोषिकाकरिता)	मागील	८,००१–००	
	यंदाचे	२०६–०३	८,२०७–०३
डॉ. शिगणापूरकर पारितोषिक			
	मागील		५००–००
श्री शिवाजी ग्रंथालय देणगी इ.			
	मागील	१५,०००–००	
	यंदाचे	५,०२९–६९	२०,०२९–६९
श्री शिवाजी ग्रंथालय			
सरकारी अनुदान	मागील	२,०००–००	
	यंदाचे	१० ०००–००	१२,०००–००
ग्रंथ प्रकाशनाकरिता			
(सरकारी अनुदान)			५,०००–००
भविष्य निधि	मागील	१०६–००	
	यंदाचे	१९८–०४	३०४–०४
कै. नेने स्मारक फंड	मागील		७५–००
	पुढे चालू		५,९६,५५६–४७

	मागील पानावरून		५,७०,६४१–५१
कर्मचारी अग्रिमा	मागील	७३–००	
	यंदाचे	२–००	७५–००
नाट्यसमिति हिशेब येणे			
(१९५६–५७)	मागील		२००–००
परीक्षा समिति हिशेब येणे			
(१९५८–५९)	मागील		५४२–६८
निलंबित खाते (सस्पेन्स)	मागील	१५–८४	
	यंदाचे	२४२–२८	२५८–१२
कै. नाना जोग स्मारक	मागील	१,१८३–६८	
	यंदाचे जमा	११३–१३	१,०७०–५५
मुदती ठेव	मागील	११,५००–००	
	यंदाचे	१०,००१–००	२१,५०१–००
श्रीशिवाजी ग्रंथालय बांधकाम			
	मागील	८,१५१–२७	
	वजा मागील चुकीचे पोटी	१५६–२७	७,९९५–००
श्रीशिवाजी ग्रंथालय बांधकामाचा अग्रिमा			
(ठेकेदार श्री. जोग)			३०००–००
	पुढे चालू		६,०५,२८३–८६

मागील पानावरून			५,९६,५५६–४७	मागील पानावरून	६,०५,२८३–८६
सामान्य निधि				**शिल्लक–**	
(जनरल फंड)	मागील	४४,२४८–७८		आय व्ययाच्या तक्त्यामध्ये दाखविल्याप्रमाणे	३२,९२४–३१
वजा व जमेपेक्षा खर्च जास्त		२,५९७–०८	४१,६५१–७०		
			६,३८,२०८–१७		६,३८,२०८–१७


प्रमाणपत्र:–विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६२ रोजी तयार असलेल्या स्थिति-विवरणात वर दिलेले आकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे प्रमाणपत्र आम्ही देतो.

महेश्वर जनार्दन गद्रे
चार्टर्ड अकौंटंटस्
१५–७–१९६२

अनुक्रमणिका

हे मासिक **एम्. जी. सराफ** यांनी नागपुर टाईम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून **प्रा. श्री. मा. कुलकर्णी** यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.


" युगवाणी " (Yugwani) Regd. No. N 3



स्वातंत्र्य दिन १९६२

आजचा दिवस म्हणजे एका महान यज्ञपूर्तीचें स्मृति-चिन्ह होय. या यज्ञामध्यें गुलामगिरींतून मुक्त होण्यासाठी आपल्या हजारो देशबांधवांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आहे.

आपण सुद्धां, आपल्या देशाची सेवा करण्यासाठी अशीच त्यागाची आणि आपलें सर्वस्व अर्पण करण्याची वृत्ती अंगी बाणवूंया. आपल्या राष्ट्राच्या योजना सफल करण्यासाठीं आपण एकदिलानें झटून आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा आणि उत्कर्षाचा भक्कम पाया बांधू या.



आपलें राज्य व राष्ट्र शक्तिशाली करा

प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

अनुक्रमणिका